cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक


बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–४ | सोमवार दि.२३ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### भोंदूबाबांचा कहर आणि व्यवस्थेची लाज...

नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या अशोक खरात या तथाकथित भोंदूबाबाच्या कृत्यांनी महाराष्ट्र हादरला आहे. महिलांच्या श्रद्धेचा, असहायतेचा आणि भावनिक कमकुवतपणाचा गैरफायदा घेत लैंगिक शोषणाची घाणेरडी मालिका राबवणाऱ्या या प्रकरणाने समाजमन संतप्त झाले आहे. मात्र या संतापामागे केवळ एका विकृत व्यक्तीचा निषेध नाही, तर त्या भोवती उभ्या राहिलेल्या सत्ताकेंद्रांचा, राजकीय आश्रयाचा आणि सामाजिक अंधश्रद्धेचा तीव्र विरोध आहे.

# महाडीबीटी पोर्टल ठप्प; कृषी यांत्रिकीकरण अनुदानासाठी शेतकरी प्रतीक्षेत



पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांतील अनुदान तातडीने व पारदर्शक पद्धतीने मिळावे, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'महाडीबीटी' पोर्टलची प्रक्रिया सध्या पूर्णपणे ठप्प झाली आहे. विशेषतः कृषी यांत्रिकीकरण घटकांसाठी आवश्यक असलेली पूर्वसंमती प्रक्रिया बंद असल्याने हजारो अर्ज प्रलंबित राहिले असून, शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.**

कृषी यांत्रिकीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल करण्यात आले होते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून पोर्टलवरील संबंधित टॅब बंद असल्यामुळे मंजुरीची प्रक्रिया पुढे सरकत नाही. परिणामी, पूर्वसंमती मिळालेल्यांपैकी मोजक्याच शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुदानाचा लाभ मिळाला असून, उर्वरित शेतकरी अजूनही प्रतीक्षेत आहेत.ङ्मया पार्श्वभूमीवर शेतकरी सातत्याने कृषी विभागाकडे चौकशी करत असले तरी, तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय कारणांमुळे अधिकाऱ्यांकडे ठोस उत्तर नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, डिजिटल प्रणालीद्वारे अनुदान वाटप सुलभ करण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या या पोर्टलवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या केवळ अनुसूचित जाती व जमाती (एससी–एसटी) प्रवर्गासाठी मर्यादित स्वरूपात टॅब सुरू असल्याची माहिती असून, इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी कोणतीही कार्यवाही होत नाही. कृषी अधिकारी स्तरावरही मंजुरीसाठी आवश्यक टॅब बंद असल्याने प्रस्ताव पुढे पाठविणे अशक्य झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे यंत्रसामग्री खरेदीचे ▶▶ पान २ वर

**शेतकऱ्यांची मागणी**

शासनाने तातडीने महाडीबीटी पोर्टल सुरळीत करून कृषी यांत्रिकीकरणासाठीची पूर्वसंमती प्रक्रिया पुन्हा सुरू करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा शेतकरी संघटनांकडून दिला जात आहे.

## थोडक्यात...

### डोनाल्ड ट्रम्प यांची प्रकृती अस्वस्थ?

न्युयॉर्कः डोनाल्ड ट्रम्प एअर फोर्स वनच्या पायऱ्यांवरून काळजीपूर्वक खाली उतरत असल्याचा एक व्हिडिओ समोर आल्याने त्यांच्या आरोग्याबद्दल नवीन चर्चा सुरू झाली आहे. सोशल मीडिया वापरकर्ते त्यांच्या हालचालींचे बारकाईने निरीक्षण करत आहेत आणि त्यांच्या शारीरिक स्थितीबद्दल प्रश्न उपस्थित करत आहेत. २१ मार्च रोजी ७९ वर्षीय डोनाल्ड ट्रम्प फ्लोरिडामध्ये दाखल झाले तेव्हा चित्रित झालेला हा व्हिडिओ ऑनलाइन वेगाने पसरला आणि त्यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. काहींना त्यांच्या सावध पावलांमध्ये अस्वस्थतेची चिन्हे दिसली, तर काहींनी ही चर्चा अतिरंजित असल्याचे सांगून फेटाळून लावली. या क्लिपमध्ये, डोनाल्ड ट्रम्प रेलिंगला धरून विमानाच्या पायऱ्या स्थिर पण सावध गतीने उतरताना दिसत आहेत. जमिनीवर सुरक्षितपणे पोहोचण्यापूर्वी ते मध्येच थोडा वेळ थांबतात. गेल्या काही महिन्यांत डोनाल्ड ट्रम्प यांच्या शारीरिक स्वरूपावर वाढत्या लक्ष केंद्रित होण्याच्या पार्श्वभूमीवर हा नवीनतम व्हिडिओ समोर आला आहे. निरीक्षकांनी त्यांच्या सुजलेल्या घोट्यांकडे, त्वचेच्या रंगातील बदलांकडे आणि इतर दृश्यमान लक्षणांकडे लक्ष वेधले आहे.

### इराण युद्धाचा एअर इंडियाला मोठा फटका

नवी दिल्लीः इराणमधील सुरू असलेल्या संघर्षामुळे एअर इंडियाने गेल्या तीन आठवड्यांत पश्चिम आशियातील सुमारे २,५०० उड्डाणे रद्द केली आहेत. सध्या या भागात एअर इंडियाच्या नियमित वेळापत्रकाच्या तुलनेत केवळ ३० टक्के उड्डाणे सुरू असल्याची माहिती एअरलाइनचे मुख्य कार्यकारी अधिकारी कॅम्पबेल विल्सन यांनी कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात दिली आहे. विल्सन यांनी पत्रात नमूद केले आहे की, मध्यपूर्वेतील संघर्षामुळे केवळ एअर इंडियाच नव्हे, तर संपूर्ण विमान वाहतूक क्षेत्रावर आर्थिक परिणाम होऊ लागला असून विमान इंधनाचे दर दुपटीने वाढले आहेत. हवाई क्षेत्र आणि विमानतळ बंद असल्याने किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव एअर इंडियाला आपली ७० टक्के उड्डाणे स्थगित करावी लागली आहेत.

### भेसळयुक्त दुधामुळे १६ जणांचा मृत्यू

हैदराबादः आंध्र प्रदेशातील गोदावरी जिल्हा येथे भेसळयुक्त दूध प्रकरणामुळे मोठी दुर्घटना घडली असून, तब्बल १६ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, आणखी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लालाचेरुवु, चौदेस्वरनगर आणि स्वरूपनगर या भागांत फेब्रुवारी महिन्यापासून भेसळयुक्त दूध विकले जात होते. हे दूध सेवन केल्यानंतर नागरिकांना मळमळ, उलट्या, पोटदुखी, लघवी बंद होणे आणि मूत्रपिंड निकामी होणे यांसारखे गंभीर त्रास होऊ लागले. २२ फेब्रुवारीपासून या तक्रारी समोर येऊ लागल्या. तपासादरम्यान नरसापूरम येथील एका डेअरीमधूनच हे भेसळयुक्त दूध पुरवले जात असल्याचे उघड झाले. या दुधात 'एथिलीन ग्लायकॉल'सारखा विषारी रसायन मिसळल्याचे समोर आले आहे.

# मंत्र्यांचे नाव घेऊन राजकारण करू नका, माझ्याकडेही भक्कम पुरावे

**कॅप्टन खरात प्रकरणावरून मुख्यमंत्री फडणवीस विरोधकांवर संतापले**

नागपूर । प्रतिनिधी



बहुचर्चित अशोक खरात प्रकरणी केवळ कोणासोबत फोटो आहे म्हणून मंत्र्यांवर आरोप करणे चुकीचे आहे. या प्रकरणात राजकारण करण्यापेक्षा पीडित महिलांना न्याय मिळणे महत्त्वाचे आहे, असे ठाम प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि.२२) येथे केले. तपासात कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, मात्र पुराव्याशिवाय मंत्र्यांची बदनामी सहन केली जाणार नाही, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना ठणकावले.

मुख्यमंत्री म्हणाले की, महिलांशी झालेल्या गैरव्यवहाराबाबत वरिष्ठ पातळीवर सखोल तपास सुरू आहे. या प्रकरणाचे दररोज मॉनिटरिंग केले जात असून, मी स्वतः पोलीस महासंचालकांशी बोललो आहे. नाशिक पोलीस आणि एसआयटी या प्रकरणाच्या मुळाशी जात आहेत. ज्यांच्याकडे काही पुरावे असतील, त्यांनी ते थेट पोलिसांकडे द्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता फडणवीस यांनी टोला लगावला की, विशेष मंत्रिमंडळ बैठकीत ४० किलोमीटरवरून पाणीपुरवठा करताना कोणाला झुकते ▶▶ पान २ वर

# चाकणकर मोठ्या सेक्स रॅकेटच्या सूत्रधार; रुपाली ठोंबरेंचा गंभीर आरोप

पुणे । प्रतिनिधी

**रुपाली चाकणकर या महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या सेक्स रॅकेटच्या सूत्रधार असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली ठोंबरे–पाटील यांनी केला आहे. रुपाली ठोंबरे–पाटील यांनी फेसबुकवर पोस्ट केलेल्या पत्रामध्ये हा आरोप केला आहे. महत्त्वाचे म्हणजे ज्या पत्रात हा गंभीर आरोप आहे, ते पत्र त्यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिले आहे.**



नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात ऊर्फ कॅप्टन याच्या पेन ड्राईव्हमध्ये सापडलेल्या ५८ व्हीडीओने खळबळ उडाली आहे. बलात्काराचा संशयित आरोपी अशोक खरात याला अटक करण्यात आली असून, २४ मार्चपर्यंत कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान चाकणकरांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा सुनेत्रा पवारांकडे सुपुर्द केला. रुपाली चाकणकरांच्या राजीनाम्यानंतर पुन्हा रुपाली ठोंबरे–पाटील यांनी त्यांच्यावर गंभीर आरोप केले. यावेळी रुपाली ठोंबरे पाटलांनी आपल्या फेसबुकवरून मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिल्याचा फोटो शेअर केला आहे. जे पत्र रुपाली ठोंबरे पाटलांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिले आहे, त्या पत्रातील विषय 'रुपाली चाकणकर हिला महाराष्ट्रातील सर्वांत मोठा सेक्स रॅकेट सूत्रधार ▶▶ पान २ वर

# युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी घेतली बैठक

दिल्ली । वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी राष्ट्रीय राजधानीत, पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोलियम, कच्चे तेल, गॅस, वीज आणि खत क्षेत्राशी संबंधित परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी एका उच्चस्तरीय बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. देशभरात अत्यावश्यक संसाधनांचा अखंड पुरवठा, स्थिर लॉजिस्टिक्स आणि कार्यक्षम वितरण सुनिश्चित करण्यावर या बैठकीत लक्ष केंद्रित करण्यात आले. पंतप्रधानांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, आरोग्य मंत्री जेपी नड्डा, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासह वरिष्ठ मंत्री उपस्थित होते.

# हॉटेल, उपहारगृहांसाठी आता २० टक्के अतिरिक्त गॅस पुरवठा

**छगन भुजबळ यांची माहिती, हॉटेल चालकांना मिळणार दिलासा**

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसेच औद्योगिक कॅन्टीन आणि अन्न प्रक्रिया–दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून केंद्र शासनाच्या निर्देशानुसार २० टक्के अतिरिक्त व्यापारी एलपीजी पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.**



छगन भुजबळ म्हणाले की, केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने दिलेल्या सूचनांनुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के वाटप मंजूर होते. आता २३ मार्च २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत आणखी २० टक्के वाटप वाढविण्यात आले असून एकूण गॅस पुरवठा पूर्व–संकट पातळीच्या ५० ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणींसाठी ई–केवायसीसाठी शेवटचे १० दिवस शिल्लक

मुंबई । प्रतिनिधी

**लाडकी बहीण योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातील पडताळणीसाठी आता केवळ शेवटचे १० दिवस शिल्लक आहेत. ३१ मार्चपर्यंत लाभार्थ्यांची अंतिम यादी निश्चित केली जाणार आहे. तर अपात्र महिलांची संख्याही वाढण्याची शक्यता आहे.**

आतापर्यंत ४५ लाखांपेक्षा जास्त महिलांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. अटी आणि नियमांचे पालन न करणाऱ्या लाडक्या बहिणींवर कडक कारवाई देखील करण्यात येत असल्याचे समोर आले आहे. ई–केवायसी अखेरच्या टप्प्यात आहे, पण जानेवारीनंतर



लाडकीच्या खात्यात एकही हप्ता आलेला नाही. ३१ मार्च रोजी लाडकी बहीण योजनेसाठी ई–केवायसी ▶▶ पान २ वर

# खरात प्रकरणात एसआयटीच्या तपासाला वेग

**मंदिराचा पुजारी आणि सुरक्षारक्षकाची कसून चौकशी**

नाशिक । प्रतिनिधी

**स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात याच्याविरुद्ध बलात्कार, नरबळी आणि जादूटोण्याचा आरोप असलेल्या प्रकरणात रविवारी एसआयटीने नाशिकमधील ईशानेश्वर महादेव मंदिराचे पुजारी आणि एका सुरक्षारक्षकाची चौकशी केली. या कारवाईमुळे खरातच्या बाबतीतील अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**

आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखालील एसआयटीने या प्रकरणाचा तपास हाती घेतला आहे. शनिवारी खरातच्या कार्यालयातील कर्मचारी नीरज जाधव याची तब्बल सात तास चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर रविवारी तपास पथकाने आपला मोर्चा सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील ईशानेश्वर मंदिराकडे ▶▶ पान २ वर

# अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा इराणला ४८ तासाचा अल्टीमेटम

**होर्मुझा खाडीचा मार्ग सर्वांसाठी खुला ठेवण्याची केली मागणी**

न्युयॉर्क । वृत्तसंस्था

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांना जाऊ देण्याबाबत इराणने आपली भूमिका नरम केली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या एका वरिष्ठ प्रतिनिधीने म्हटले आहे की, ''शत्रूंशी'' म्हणजेच अमेरिका आणि इस्रायलशी संबंधित जहाजे वगळता, हा जलमार्ग सर्व प्रकारच्या जहाजांसाठी खुला राहील. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, जर हा जलमार्ग ४८ तासांत ''पूर्णपणे खुला'' झाला नाही, तर इराणच्या वीज प्रकल्पांना लक्ष्य करण्याची धमकी दिल्यानंतर काही तासांतच हे विधान आले आहे. आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेतील ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ३४३.५० क्विंटल | २,१२५ | २,५७० | २,२४६ |
| ज्वारी/हायब्रिड : २४६.५० क्विंटल | १,६०० | ४,६०० | ३,२० |
| मका/लोकलः ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ११.०० क्विंटल | ७,००० | ७,२०० | ७,१३३ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरीः १४.०० क्विंटल | २,५०० | ३,०६९ | २,७८८ |
| मुगः २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीनः १.५० क्विंटल | ५,१५० | ५,१५० | ५,१५० |
| हरभराः २७.०० क्विंटल | ४,८५० | ५,१०० | ४,९३१ |

# मुख्यमंत्री, डॉ.ज्योती मेटे यांना न्याय देतील का?

**महिला आयोगाच्या रिक्त पदावर कोणाची लागणार वर्णी**



मुंबई–बीड । प्रतिनिधी

**राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या आयोगाच्या अध्यक्षपदासाठी महायुती मधून अनेकांची नावे पुढे येत आहेत, मात्र मराठा आरक्षणासाठी आपले बलिदान देणाऱ्या स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या पत्नी डॉक्टर ज्योती मेटे यांना या पदावर बसून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे त्यांना न्याय देतील का ? अशी चर्चा शिवसंग्रामच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सुरू आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्वर्गीय विनायकराव मेटे यांचे घनिष्ठ संबंध होते. अनेक वेळा भाजप अडचणीत असताना स्वर्गीय मेटे यांच्या रूपाने शिवसंग्राम मदतीला धावून आलेली आहे. विशेषतः मराठा आरक्षणामध्ये स्वर्गीय विनायक मेटे यांचे फार मोठे योगदान आहे. मराठा आरक्षणाची चळवळ अण्णासाहेब पाटील नंतर विनायक मेटे यांनी महाराष्ट्रभर सुरू केली होती. मराठा आरक्षणासंदर्भात आयोजित केलेल्या बैठकीला मुंबईकडे जात असताना तात्कालीन आमदार विनायक मेटे यांच्या गाडीचा अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यानंतर शिवसंग्रामची सुत्रे त्यांच्या पत्नी डॉक्टर ज्योती मेटे यांनी हाती घेतली आणि संघटन मजबूत करण्याचा प्रयत्न केला. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे हे पद रिक्त आहे. या पदावर सत्ताधारी असलेल्या महायुती मधील कोणाची तरी वर्णी लागणार हे जवळपास निश्चित आहे. त्यातच स्वर्गीय विनायक मेटे यांचे सरकार, मराठा आरक्षण आणि सामाजिक कार्यातील योगदान पाहता डॉक्टर ज्योती मेटे ▶▶ पान २ वर

**❝ राजकीय निर्णय फसले**

स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर शिवसंग्राम आणि पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी डॉक्टर ज्योती मेटे यांनी घेतलेले काही निर्णय अनेकांना खटकले होते. महायुतीमध्ये शिवसंग्राम असताना त्यांनी लोकसभेला पवारांची जवळीक करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विधानसभेला उमेदवार दिलेला असताना त्याविरुद्ध बंडखोरी केली आणि अपयश आले. मात्र कार्यकर्ते सक्रिय करण्यासाठी असे निर्णय घेणे गरजेचे होते.

cmyk

## अग्रलेख

# भोंदूबाबांचा कहर आणि व्यवस्थेची लाज...

नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या अशोक खरात या तथाकथित भोंदूबाबाच्या कृत्यांनी महाराष्ट्र हादरला आहे. महिलांच्या श्रद्धेचा, असहायतेचा आणि भावनिक कमकुवतपणाचा गैरफायदा घेत लैंगिक शोषणाची घाणेरडी मालिका राबवणाऱ्या या प्रकरणाने समाजमन संतप्त झाले आहे. मात्र या संतापामागे केवळ एका विकृत व्यक्तीचा निषेध नाही, तर त्या भोवती उभ्या राहिलेल्या सत्ताकेंद्रांचा, राजकीय आश्रयाचा आणि सामाजिक अंधश्रद्धेचा तीव्र विरोध आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा या प्रकरणाशी संबंध जोडला गेल्यानंतर परिस्थिती अधिक गंभीर झाली. एका संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीचा अशा भोंदू व्यक्तीशी जवळीक असणे आणि त्याचे समर्थन केल्याचा आरोप होणे, ही राज्याच्या संस्थात्मक विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उभे करणारी बाब आहे. त्यांच्या राजीनाम्याने तात्पुरता राजकीय तणाव कमी झाला असेल, पण या घटनेने व्यवस्थेतील खोलवरच्या त्रुटी उघड केल्या आहेत.

या प्रकरणात देवेंद्र फडणवीस, सुनेत्रा पवार, प्रफुल्ल पटेल यांसारख्या राजकीय नेतृत्वाची भूमिका पुढे आली. राजीनामा हा केवळ 'डॅमेज कंट्रोल'चा भाग ठरू नये. खऱ्या अर्थाने जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करणे हीच खरी कसोटी आहे. अन्यथा, अशा घटनांमधून समाजात ''प्रभावशाली लोकांना काहीच होत नाही'' असा धोकादायक संदेश जातो. या प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि सुषमा अंधारे यांनी सातत्याने आवाज उठवून मुद्दा जिवंत ठेवला, ही बाबही तितकीच महत्त्वाची आहे. लोकशाहीत अशा जागरूकतेची गरज असते, अन्यथा सत्तेच्या आड अनेक गुन्हे गाडले जातात.

मात्र या सर्व गोंधळात सर्वात मोठा प्रश्न उरतो तो म्हणजेअशा भोंदूबाबांना एवढी ताकद मिळतेच कशी? अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अस्तित्वात असूनही समाजातील मोठा वर्ग अजूनही 'दैवी शक्ती', 'संमोहन', 'गुप्त विधी' यांसारख्या फसव्या गोष्टींना बळी पडतो. शिक्षण, जागरूकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा अभाव ही या समस्येची मुळे आहेत.

अशोक खरातसारखे लोक केवळ स्वतःच्या विकृत प्रवृत्तीने नव्हे, तर समाजातील भीती, अज्ञान आणि राजकीय पाठबळ यांच्या संगनमतातून निर्माण होतात. जेव्हा प्रभावशाली नेते, सेलिब्रिटी किंवा अधिकारी अशा लोकांकडे जातात, तेव्हा सामान्य जनतेचा विश्वास अधिक दृढ होतो आणि अशा भोंदूबाबांचे साम्राज्य वाढते.

या प्रकरणात आर्थिक व्यवहार, राजकीय संबंध आणि गुन्हेगारी कृत्ये यांचा गुंता स्पष्ट दिसतो. त्यामुळे चौकशी केवळ वरवरची न राहता सर्वांगीण आणि निष्पक्ष असली पाहिजे. कॉल डिटेल्सपासून आर्थिक व्यवहारांपर्यंत प्रत्येक पैलू तपासला गेला पाहिजे. कोणत्याही दबावाला बळी न पडता सत्य बाहेर आणणे ही यंत्रणांची जबाबदारी आहे.

महिलांच्या सन्मान आणि सुरक्षेसाठी अस्तित्वात असलेल्या संस्थेच्या प्रमुखालाच राजीनामा द्यावा लागणे, ही राज्यासाठी लाजिरवाणी बाब आहे. हा प्रसंग केवळ व्यक्तीपर्यंत मर्यादित न ठेवता व्यवस्थात्मक सुधारणा करण्याची संधी म्हणून पाहिला गेला पाहिजे. शेवटी, या प्रकरणातून एक स्पष्ट संदेश मिळतो.

अंधश्रद्धा, सत्ता आणि पैसा यांचे घातक त्रिकोण समाजासाठी अत्यंत धोकादायक आहे.

जर आता तरी कठोर आणि पारदर्शक कारवाई झाली नाही, तर अशा 'भोंदू साम्राज्यांना' आळा बसणार नाही. आणि मग प्रत्येक अशा घटनेनंतर फक्त संताप व्यक्त करणे आणि राजीनाम्यांवर समाधान मानणे हीच आपली नियती ठरेल.

# बीड येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन आता ३ एप्रिल ऐवजी १ मे ला होणार सुरु

## आयोजक कृषीभूषण महेश बेदरे यांची माहिती

**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने विविध ठिकाणी कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यावर्षी बीड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार ३ ते ६ एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आलेले कृषी प्रदर्शन काही तांत्रिक कारणास्तव पुढे ढकलण्यात आले असून आता महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने १ मे ते ५ मे या कालावधीत भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन होणार असल्याची माहिती अयोजक कृषीभूषण महेश बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिलीआहे.**

छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल (मल्टी पर्पज ग्राउंड), बीड येथील विस्तीर्ण मैदानावर पाच दिवसीय किसान कृषी महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नवतंत्रज्ञान उपलब्ध व्हावे या हेतूने किसान कृषी विकास प्रतिष्ठानने यापूर्वी गेवराई, जालना, परभणी, हिंगोली आदी ठिकाणी अशा प्रदर्शनांचे आयोजन केले आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव पुन्हा एकदा बीड येथे हे प्रदर्शन होत आहे. या प्रदर्शनात प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन, ओंकार साखर कारखाना समूह तसेच ऑल इंडिया इनपुट डीलर असोसिएशन यांचा विशेष सहभाग असणार आहे. प्रदर्शनामध्ये आठ भव्य दालनांद्वारे सुमारे २०० कृषी उत्पादनांचे स्टॉल उभारण्यात येणार असून विविध कृषी अवजारांची प्रात्यक्षिके पाहण्याची संधी शेतकऱ्यांना मिळणार आहे. याशिवाय एकदिवसीय पशुप्रदर्शन, डॉग शो, तज्ज्ञांची चर्चासत्रे, धान्य महोत्सव, सौर ऊर्जेवरील उत्पादनांचे स्वतंत्र दालन, शेतमजुरीला पर्याय ठरणारी आधुनिक अवजारे यांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. उद्घाटन व समारोप सोहळयाला विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार असून कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. बीड शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने कृषीभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.



# गारपीटीचा तडाखा; तात्काळ पंचनामे करून भरपाई द्या

## खा.बजरंग सोनवणे यांचे जिल्हाधिकारी यांना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि गारपीटीने अक्षरशः थैमान घातले असून, शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देण्यासाठी पंचनामे करून त्वरीत आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.**

खा. बजरंग सोनवणे यांनी २० मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, १९ मार्च रोजी जिल्ह्यातील विविध भागांत झालेल्या गारपीटीमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेषतः गहू, हरभरा, ज्वारी यांसारख्या रब्बी हंगामातील पिकांना फटका बसला असून अनेक ठिकाणी पिके जमीनदोस्त झाली आहेत. यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेला शेतकरी अधिकच संकटात सापडला आहे. पत्रात पुढे नमूद करण्यात आले आहे की, शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेता प्रशासनाने विलंब न करता तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश संबंधित महसूल व कृषी विभागांना द्यावेत. प्रत्येक गावात प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानाची अचूक नोंद घेणे आवश्यक असून, पंचनाम्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखावी, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार तातडीने आर्थिक मदत मिळावी, यासाठी प्रस्ताव त्वरीत सादर करून मंजुरीची प्रक्रिया गतीमान करावी, अशी सूचनाही त्यांनी केली आहे. मदत वितरणात कोणताही विलंब होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे. यासोबतच, बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये एकाच वेळी ही मोहीम राबवून व्यापक स्तरावर पंचनामे पूर्ण करावेत आणि झालेल्या कार्यवाहीचा अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देशही खा.सोनवणे यांनी दिले आहेत. दरम्यान, गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत शासनाने तातडीने मदतीचा हात पुढे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



# वाळुंज येथे प्राजक्तताई धस यांच्या उपस्थितीत भव्य बालसाहित्य संमेलन

## मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांकडून आवाहन

**आष्टी । प्रतिनिधी**

**यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन २०२५' अंतर्गत, २३ मार्च २०२६ रोजी बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील वाळुंज येथे एका भव्य एकदिवसीय बालसाहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. 'जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे साहित्य संमेलन : एक वाङ्मयीन चळवळ' या संकल्पनेवर आधारित हे संमेलन 'आद्यकवी मुकुंदराज साहित्य नगरीत' ज्येष्ठ बालसाहित्यिक डॉ. कैलास दौंड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.**



या सोहळ्याच्या स्वागताध्यक्षपदी महानंद, मुंबईच्या संचालिका सौ. प्राजक्तताई सुरेशअण्णा धस असून, संमेलनाचे उद्घाटन राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक संदीप पवार यांच्या हस्ते होणार आहे. तसेच यशवंतराव चव्हाण सेंटरच्या शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. योगेश कुदळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सकाळी ९:३० वाजता निघणाऱ्या उत्साही ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात होणार असून, दिवसभर विविध साहित्यिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. यामध्ये बालकवींचे कवीसंमेलन, बालसाहित्यिकांचे कथाकथन, अभ्यासक्रमातील साहित्यिकांच्या मुलाखती, तसेच निमंत्रित साहित्यिकांचे मार्गदर्शन व काव्य सादरीकरण असे विविध उपक्रम पार पडतील. संमेलनाचे विशेष आकर्षण म्हणून 'ओळख कवितेची' ही नाटिका आणि 'आम्ही शिवकन्या' या गीताचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यावेळी कवी हनुमंत चांदगुडे, शंकर कसबे, सय्यद अल्लाउद्दीन, कथाकार वि. भा. साळुंके, सोमनाथ वाळके यांच्यासह शिक्षण व साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमाचे संयोजक व फेलोशिपचे मानकरी डॉ. हरिश्चंद्र नवनाथ हातवटे यांनी तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी या साहित्य सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# लेखा विभागात शासनाच्या कामात निष्काळजीपणा; लेखापालास कारणे दाखवा नोटीस

परतूर । प्रतिनिधी

परतूर नगरपालिकेच्या लेखा विभागातील कामकाजात निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत लेखापाल कल्याणी यादव यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

माहितीनुसार, अंतर्गत लेखा विभागाशी संबंधित कामे वेळेत पूर्ण न केल्याने तसेच आवश्यक माहिती ऑनलाईन न भरल्यामुळे ही कारवाई करण्यात आली. शासनाच्या आदेशानुसार दिनांक १ जानेवारी २०२६ पासून नगर परिषद कार्यालयातील २७ मॉड्यूल लाईव्ह करून सर्व कामे पोर्टलवरून करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र संबंधित लेखा विभागाकडून अद्यापही डेटा अपडेट न केल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून वारंवार विचारणा होत असतानाही कामात कसूर झाल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे ''सदर कामात विलंब का झाला?'' याबाबतचा लेखी खुलासा २४ तासांच्या आत सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. खुलासा असमाधानकारक आढळल्यास दोषारोप प्रपत्र १, २, ३ व ४ तयार करून पुढील कारवाईसाठी प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवण्यात येणार असल्याचे नोटीसमध्ये नमूद आहे. दरम्यान, ही बाब मा. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पालिका प्रशासन विभाग तसेच जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्याकडे माहितीस्तव पाठवण्यात आली आहे. तसेच संबंधित लेखापाल अप-डाउन करत असल्यामुळे कामकाजावर परिणाम होत असल्याची चर्चा आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केल्यास वस्तुस्थिती समोर येईल, अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे. परतूर नगरपरिषद सध्या भाजपच्या ताब्यात असून शहरातील नागरिकांनी आमदार बबन लोणीकर यांच्यावर विश्वास ठेवला आहे. त्यामुळे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# ठरवून दिलेल्या नियमापक्ष वाळू जास्त उपसा महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष रात्रीची वाळू वाहतूक सुरु

**जालना । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील बळेगाव व इतर वाळू घाटातून ठरवून दिलेल्या मयदिपेक्षा अधिक वाळू उपसा करण्यात येत ह असल्याचा आरोप ग्रामस्थानातून केला जात आहे . तसेच नियमाप्रमाणे रात्रीची वाळू खाली करता येत नाही परंतु रात्रभर वाळूचे वाहन विना नंबर सुरू असल्याचे दिसून येत आहे महसूल चे पथक हे झोपीचं साँग घेत आहे यावरून दिसून येत आहे. याप्रकरणी तलाठी मंडळ अधिकारी काहीच बोलायला तयार नाही हा सगळा प्रकार संगणमताने सुरू असल्याचे यावरून दिसून येत आहे. याप्रकरणी आता जिल्हाधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी अंबड विभागीय अधिकारी का कारवाई करतात यावरून आता दिसून येईल. महसूल प्रशासन आणि उप-प्रादेशिक परिवहन विभागाने याकडे लक्ष देण्याची मागणी केली जात आहे. या घाटातून ४०१९ ब्रास वाळू उपशाची परवानगी देण्यात आली होती. मात्र, त्यापेक्षा अधिकचा उपसा करण्यात आल्याचा आरोप - ग्रामस्थांनी केला आहे.



या घाटातील वाळूउपसा वाळू घेऊन जाताना हायवा वाहन. पर्यावरणाला धोका निर्माण करत आहे. नदीकाठावरील शेती, माती धूप आणि जलस्रोतांचे नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. गेल्या एका महिन्यात ठरवून दिल्यापेक्षा अतिरिक्त वाळू उपसा केल्याचा अंदाज ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. तरीही याबाबत अद्याप कारवाई केलेली नाही. याची चौकशी व्हावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. परिवहन विभागाने ओव्हरलोडिंगवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे पण प्रत्यक्ष कारवाई होत नसल्याचे ग्रामस्थ म्हणाले.

पान १ वरून...

### महाडीबीटी पोर्टल ठप्प; कृषी

नियोजन कोलमडले असून, येणाऱ्या हंगामावर त्याचा गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

---------

### चाकणकर मोठ्या सेक्स रॅकेटच्या

म्हणून आरोपी करणेबाबत', असा आहे. शिवाय यामध्ये त्यांनी चाकणकरांवर गंभीर आरोप केले आहेत. प्रथमतः महाराष्ट्राला काळिमा फासणारे हे सेक्स रॅकेट आपण निडरपणे उघडकीस आणल्याने मी महाराष्ट्रातील तमाम लाडक्या बहिणींच्या वतीने अभिनंदन करते व आभार मानते. रुपाली निलेश चाकणकर हिचे बलात्कारी भोंदूबाबा कॅप्टन खरातबरोबरचे हितसंबंध संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहेत. परंतु मला मिळालेल्या माहितीनुसार सदर प्रकरणामध्ये कॅप्टन खरात हा भोंदूबाबा हे सगळे कांड केवळ महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या सहभागामुळे व पाठिंब्यामुळेच करू शकला आहे. रुपाली चाकणकर यांनी पुण्यासह अनेक ठिकाणी पदाचा दुरुपयोग करून पोलिसांवर दबाव टाकून अनेक खोटे गुन्हे दाखल केले आहेत. त्याबाबत मी आपणास स्वतंत्र माहिती देईल. तसेच भोंदूबाबाला असे गैरकृत्य करण्यास त्यांनी पाठिंबा दिलेला आहे, असेही पाटील म्हणाल्या.

------------

### मंत्र्यांचे नाव घेऊन राजकारण करू

माप दिले गेले, हे आता माध्यमांमुळे सर्वांसमोर आले आहे. ज्यांनी हा पाणीपुरवठा मिळवून दिला, त्यांना आता कोणती शिक्षा द्यायची? सार्वजनिक जीवनात कोणीही कोणासोबत फोटो काढू शकते, त्यावरून कोणाचे गुन्हेगारी संबंध जोडणे चुकीचे आहे. विरोधी पक्षातील कोणकोणते नेते संबंधित ठिकाणी गेले होते, याचे भक्कम पुरावे माझ्याकडे आहेत. त्यामुळे केवळ सिलेक्टिव्ह राजकारण करू नका. विशिष्ट मंत्र्यांचे नाव घेणारे लोक स्वतःच्या पुराव्यांबाबत आता गप्प का आहेत? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आम्हाला राजकारणात रस नाही, तर महिलांच्या सन्मानाची चिंता आहे. त्यांना न्याय मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे फडणवीस म्हणाले.

--------------

### लाडक्या बहिणींसाठी ई-केवायसीसाठी

करण्याची मुदत संपणार आहे. ई-केवायसीला मुदतवाढ दिल्यानंतर लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे आलेले नाहीत. त्यामुळे फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचा हप्ता कधी येणार? याची प्रतीक्षा लाडक्या बहिणींकडून केली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, लाडकीच्या खात्यात दोन महिन्यांचे तीन हजार रुपये एकत्र येण्याची शक्यता आहे. एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अथवा १० एप्रिलपर्यंत लाडकीच्या खात्यात पैसे येऊ शकतात. ई-केवायसीनंतर अर्जांची पडताळणी केली जाणार आहे. त्यानंतर पात्र महिलांच्या खात्यात हप्ता वितरण केला जाईल, असे सांगण्यात येत आहे. लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी करण्यासाठी अखेरचे १० दिवस शिल्लक आहेत. पण अपुरी कागदपत्रे अथवा इतर कारणांमुळे काही महिलांना मुदतीत प्रक्रिया पूर्ण करता येत नाही. त्यामुळे अपात्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक महिलांना १५०० रुपयांचा लाभ बंद होण्याची भीती सतावत आहे. ई-केवायसी केली नाही, तर पात्र असतानाही १५०० रुपये बंद होणार आहेत. कारण, त्यांचे नाव लाडक्या बहिणींच्या यादीतून वगळले जाणार आहे. त्यामुळे अनेक लाभार्थी महिला चिंतेत आहेत. त्यामुळे ई-केवायसीची मुदत संपण्यास १० दिवसच शिल्लक राहिलेले असल्याने या ई-केवायसीमध्ये बदल करण्याची लगबग सुरू झाली आहे.

-----------

### हॉटेल, उपहारगृहांसाठी आता

टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले की, या अतिरिक्त २० टक्के वाटपात हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया व दुग्धव्यवसाय यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स आणि स्थलांतरित मजुरांसाठीच्या योजनांनाही लाभ मिळणार आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले की, या निर्णयामुळे व्यापारी एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल आणि उपहारगृह व्यवसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, गॅस मिळविण्यासाठी संबंधित व्यावसायिकांना तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे आणि पीएनजीसाठी अर्ज करणे बंधनकारक राहणार आहे. पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले की, केंद्राच्या या निर्णयामुळे राज्यातील खाद्यव्यवसायाला मोठा दिलासा मिळणार असून पुरवठा साखळी अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, राज्यातील केरोसिन वितरणाबाबतही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. प्रलंबित परवाने नूतनीकरण झालेले मानण्यात येणार असून, कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच वारसांच्या नावे परवाने तात्काळ वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या गावामध्ये किरकोळ केरोसिन परवानाधारक उपलब्ध नाहीत, अशा गावांमध्ये रास्तभाव दुकानदारास किरकोळ केरोसिन परवानाधारक समजण्यात येऊन त्यास परवाना देण्यात यावा. राज्यातील किरकोळ, हॉकर्स, अर्धघाऊक व घाऊक केरोसिन परवाने मंजुरी, नुतनीकरण व वारसाच्या नावे वर्ग करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत शासनपत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या असल्याचेही यावेळी सांगितले.

-------

### अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प

इराणचे प्रतिनिधी अली मौसवी यांनी रविवारी सांगितले की, ''इराणच्या शत्रूंशी'' संबंधित नसलेली जहाजे तेहरानसोबत सुरक्षा आणि संरक्षणाच्या व्यवस्थेमध्ये समन्वय साधून या सामुद्रधुनीतून जाऊ शकतात. इराणचे प्रतिनिधी अली मौसवी पुढे म्हणाले की, सागरी सुरक्षा सुधारण्यासाठी आणि आखातातील खलाशांचे संरक्षण करण्यासाठी तेहरान संयुक्त राष्ट्रांच्या संस्थेसोबत सहकार्य करण्यास तयार आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील ''सध्याच्या परिस्थितीच्या मुळाशी'' इराणवरील इस्रायली आणि अमेरिकन हल्ले आहेत. इराणचे प्रतिनिधी अली मौसवीपुढे म्हणाले की, ''मुत्सद्देगिरी हे इराणचे प्राधान्य आहे. तथापि, आक्रमणाची संपूर्ण समाप्ती तसेच परस्पर विश्वास आणि आत्मविश्वास अधिक महत्त्वाचे आहेत,'' असेही यावेळी सांगितले. इराणने २८ फेब्रुवारी रोजी, जागतिक तेल आणि द्रवीकृत वायूच्या पुरवठ्यापैकी पाचवा भाग ज्यामधून जातो, तो महत्त्वाचा ऊर्जा पुरवठा मार्ग बंद केला. अमेरिका, इस्रायल आणि त्यांच्या भागीदारांपर्यंत 'एक लिटर तेलसुद्धा पोहोचू देणार नाही' असे इराणने म्हटले आहे. इराणविरुद्धच्या अमेरिका-इस्रायल युद्धादरम्यान इराणकडून होणाऱ्या हल्ल्यांच्या धोक्यामुळे, जागतिक तेल आणि द्रवीकृत नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यापैकी सुमारे पाचवा भाग वाहून नेणारा हा अरुंद सामुद्रधुनीमार्ग बहुतेक जहाजांना पार करता आलेला नाही, ज्यामुळे जागतिक ऊर्जा संकटाचा धोका निर्माण झाला आहे. अमेरिकेने या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांना संरक्षण देण्यासाठी नौदल आघाडी उभारण्याचा प्रयत्न केला आहे, तर बहुतेक नाटो मित्र राष्ट्रांनी इराणविरुद्धच्या लष्करी कारवायांमध्ये सहभागी होण्याची इच्छा नसल्याचे म्हटले.

----------

### खरात प्रकरणात एसआयटीच्या

वळवला. येथील केअरटेकर पुजारी प्रमोद गडाख आणि एका सुरक्षारक्षकाचा चौकशी करण्यात आली . अशोक खरातच्या अटकेनंतर तपासाची व्याप्ती वाढत गेली असून, खरातचे राजकीय संबंध आणि सिन्नरमधील जमिनीचे व्यवहार पोलीस खंखाळून पाहत आहेत. तपासाचा भाग म्हणून पोलिसांनी खरातचे मिरगाव येथील फार्महाऊस, टिकडे कॉलनीतील बंगला आणि कॅनडा कॉर्नर येथील कार्यालयातील सीसीटीव्ही डीव्हीआर जप्त केले आहेत. खरातवर वावी, शिर्डी आणि सरकारवाडा पोलीस ठाण्यात खंडणी, ब्लॅकमेलिंग, बलात्कार आणि जादूटोण्याचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सरकारवाडा पोलीस ठाण्यात एका महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, त्याच्यावर 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा प्रतिबंध व उच्चाटन कायद्या'नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, खरातने स्वतः देखील दोन व्यक्तींविरुद्ध आपल्याला अश्लील फोटोंच्या आधारे ब्लॅकमेल केल्याची तक्रार वावी पोलीस ठाण्यात दिली आहे. या प्रकरणाचे पडसाद राजकीय वर्तुळातही उमटले आहेत. राज्य जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी एक मोठा निर्णय घेत, खरातशी संबंधित 'शिवनिक संस्थान' या ट्रस्टला दारणा धरणातून दररोज ३९ लाख लिटर पाणी उचलण्याची परवानगी देणारा २०२० मधील शासन निर्णय रद्द केला. पिण्याच्या पाण्यासाठी घेतलेले हे पाणी खरात आपल्या आंब्याच्या बागांसाठी वापरत असल्याचा आरोप आहे. हे पाणी कोणत्या आधारावर मंजूर झाले, याची चौकशी करण्याचे आदेशही मंत्र्यांनी दिले आहेत.

-------------

### मुख्यमंत्री, डॉ.ज्योती मेटे

यांना शासन न्याय देईल, असे अपेक्षा अनेकांकडून व्यक्त केली जात आहे. ज्योती मेटे यांना प्रशासनातील मोठा दांडगा अनुभव आहे. शिवाय राजकारणातील देखील त्यांना अनुभव आहे. महिला चळवळीमध्ये त्या अग्रस्थानी असतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉक्टर ज्योती मेटे यांना आयोगाचे अध्यक्ष केल्यास खऱ्या अर्थाने मुख्यमंत्र्याकडून स्वर्गीय विनायक मेटे यांना खरी श्रद्धांजली ठरेल यात शंका नाही.

# नवोदय परीक्षेत विश्वजीत चोले यांचे घवघवीत यश

वडवणी । प्रतिनिधी

जिजामाता विद्यालय तेलगाव येथील विद्यार्थी तसेच वडवणी येथील प्रसिद्ध माऊली झेरॉक्स मालक रणजीत भारत चोले यांचे चिरंजीव विश्वजीत रणजीत चोले याने नुकत्याच जाहीर झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश पूर्व परीक्षेत दैदिप्यमान असे यश मिळवत संपूर्ण जिल्ह्यातून या परीक्षेत ५६ व्या रँकनूसार व ९५ टक्के गुणांसह नवोदय विद्यालयातील आपल्या प्रवेशासाठी तो पात्र ठरला आहे. त्याच्या या यशाबध्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.



शिक्षण क्षेत्रामध्ये अतिशय प्रतिष्ठित अशा समजल्या जाणाऱ्या व केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली असलेले बीड जिल्ह्यातील एकमेव असलेल्या नवोदय विद्यालय गढी या विद्यालयामध्ये इयत्ता सहावी प्रवेश पूर्व परीक्षा डिसेंबर २०२५ मध्ये संपन्न झाली होती. या परीक्षेचा निकाल मंगळवारी ऑनलाईन पध्दतीने जाहीर झाला. या परीक्षेत धारूर तालुक्यातील तेलगाव येथील जिजामाता विद्यालय याठिकाणी इयत्ता पाचवी वर्गात शिक्षण घेत असलेला चिरंजीव विश्वजीत रणजीत चोले याने आपल्या गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली कुशाग्र बुध्दीमत्तेच्या बळावर परीक्षेत दैदिप्यमान असे यश मिळवत संपूर्ण जिल्ह्यातून या परिक्षेत ५६ व्या रँकनूसार व ९५ टक्के गुणांसह नवोदय विद्यालयातील आपल्या प्रवेशासाठी तो पात्र ठरला आहे. विश्वजीत रंजीत चोले हा वडवणी तालुक्यातील खडकी येथील भारत जानू चोले यांचे नातू आहे त्याच्या या यशामागे तिचे कुटुंबीय पालक तसेच आजवर त्याला प्रत्येक ठिकाणी उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून लाभलेले खांडवे कोचिंग क्लासेस वडवणी व जिजामाता विद्यालय तेलगाव येथील तिचे सर्व गुरुजन वर्ग यांचे परिश्रम आहेत. या यशाचे सर्व श्रेय त्यांनाच जाते. या यशाबद्द शाळेतील सर्व गुरुजनवर्ग तसेच वडवणी व तालुक्यातील पत्रकारिता,शिक्षण क्षेत्रासह सर्वच क्षेत्रातील त्यांचे स्नेहीजन यांनी चि.विश्वजीत ला अभिनंदन करुन त्याला त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २३ मार्च २०२६



# दै.राज्य लोकतंत्रच्या वर्धापन दिनानिमित्त मान्यवरांची उपस्थिती



# जिथे मने जोडली जातात तिथेच पाणी थांबते-सत्यजित भटकळ

परळी वैजनाथ। प्रतिनिधी


ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी केवळ शेतीत बदल करून चालत नाही, तर विचारांत आणि सामूहिक कृतीतही परिवर्तन आवश्यक आहे. याच दृष्टीकोनातून ग्लोबल विकास ट्रस्टकडून ''माती, शेती आणि मती'' या त्रिसूत्रीवर आधारित कामाला गती देण्यात येत आहे. आतापर्यंत वैयक्तिक पातळीवर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर देण्यात आला होता; मात्र आता गाव पातळीवर एकात्मिक विकास घडवून आणण्याचे मोठे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. ग्रामीण भागातील वास्तव पाहता, अनेक शेतकरी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास संकोच करतात. काही ठिकाणी पाण्याची आणि ज्ञानाची कमतरता, तर काही ठिकाणी भांडवलाचा अभाव ही मोठी अडचण आहे. या पार्श्वभूमीवर ग्लोबल विकास ट्रस्ट शेतकऱ्यांना एकत्र आणून गट पद्धती विकसित करत आहे. या गटांमुळे केवळ उत्पादनातच वाढ होत नाही, तर दर्जेदार शेती, बाजारपेठेतील योग्य दर आणि सामूहिक निर्णयक्षमतेलाही बळ मिळते. या प्रक्रियेतून शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळत आहे. अशा बदलांच्या प्रवासात शेतकऱ्यांना




सर्वतोपरी मदत देण्याचा निर्धार मयंक गांधी यांनी व्यक्त केला.

पाण्याचे व्यवस्थापन आणि सामाजिक ऐक्य यांचा अतूट संबंध अधोरेखित करताना पानी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी महत्त्वपूर्ण मुद्दा मांडला. ''जिथे मने जोडली जातात तिथेच पाणी थांबते आणि तिथेच खरी समृद्धी निर्माण होते,'' असे सांगताना त्यांनी गावातील एकोपा, सहभाग आणि सामूहिक श्रम यांचे महत्त्व अधोरेखित केले. ''एकटा ते ऐकता'' हे सूत्र केवळ घोषवाक्य नसून ग्रामीण विकासाचा पाया आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे मांडवा पठाण येथे झालेला कार्यक्रम हा या व्यापक विचारांचा प्रत्यक्ष नमुना ठरला. नव्याने केळी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आर्थिक व तांत्रिक सहाय्य देण्यात आले. भांडवलाच्या अभावामुळे मागे राहणाऱ्या शेतकऱ्यांना च्या माध्यमातून कर्जसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले, तर सिंचनासाठी ३८ शेतकऱ्यांना ठिबक संचांचे वितरण करण्यात आले. गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर उर्वरित शेतकऱ्यांना मदत देऊन या उपक्रमाला पूर्णता देण्यात आली. मांडवा पठाण येथील हनुमान मंदिरात झालेल्या या कार्यक्रमातून एक स्पष्ट संदेश समोर आला. शाश्वत शेती आणि समृद्ध गावांसाठी केवळ संसाधने नाहीत, तर सामूहिक विचार आणि एकजूट हीच खरी ताकद आहे. या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे ट्रस्टी संजय परमार, सरपंच गणेश रुद्राक्ष, सत्यप्रेम नरवणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. मांडवा पठाण येथील कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून पापनाशी नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात येत असून त्यामध्ये घेतले जात आहेत. या संपूर्ण कामाची पाहणी करून त्याच्या प्रत्यक्ष स्वरूपाची पाहणी करण्यात आली. तसेच रेवली, मोहा, करेवाडी आणि कान्नापूर येथील प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेतांना भेट देत आंबा, डाळिंब, केळी, लिंबू तसेच रेशीम शेतीची प्रत्यक्ष पाहणी सत्यजित भटकळ यांनी केली. विविध पिकांच्या व्यवस्थापन पद्धती, उत्पादनातील गुणवत्ता आणि शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या नवकल्पनांची त्यांनी माहिती घेतली. या भेटीदरम्यान त्यांच्या समवेत डि. एल. मोहिते आणि संदीप जोशी उपस्थित होते.

# गायींना होणारे महत्वाचे रोग अन् त्यावरील घरगुती उपाय!



राज्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र, शेतकरी अनेकदा गायींना होणारे आजार आणि त्यांच्या आरोग्याकडे विशेषत्वाने लक्ष देत नाहीत. ज्यामुळे दुधाळ गायींना नकळत अनेक आजार जडतात. परिणामी, गायींच्या आरोग्यावर परिणाम होऊन दूध उत्पादनाला मोठा फटका बसतो. विशेष म्हणजे दररोज गायींकडे निरीक्षणातून या आजारांवर लक्ष ठेवले जाऊ शकते. तसेच काही घरगुती उपाय करून देखील दुधाळ जनावरांवर बरे केले जाऊ शकतात. दुग्ध व्यवसाय करताना शेतकऱ्यांना गायींना होणाऱ्या आजारांच्या घरगुती उपायांबद्दल माहिती असेल. तर शेतकरी आपल्या गायींना निरोगी ठेवण्यात सक्षम राहू शकतात. याउलट शेतकऱ्यांना माहिती नसेल तर एखादा छोटा आजार देखील मोठे रूप धारण करू शकतो. ज्यातून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे पशुपालन व्यवसाय करताना पुढील आजारांबाबत माहिती असणे आवश्यक असते.

शरिराला गोचीड होणे : गाईंना त्यांच्या शरिराला गोचीड झाल्यास, कडुलिंबाची पाने गरम पाण्यात चांगली उकळून घ्यावीत. आणि ते पाणी चांगले थंड झाल्यानंतर त्याची फवारणी गायींच्या अंगावर करावी. हा उपक्रम नियमित करायचा. ज्यामुळे गायींना होणाऱ्या गोचीडची समस्या पूर्णपणे संपुष्टात येते.

निमोनिया आजार : निमोनिया हा आजार दुधाळ गायींसाठी खूप त्रासदायक असतो. पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या मते, गायी जास्त काळ पाण्यात भिजल्यास न्यूमोनिया होतो. न्यूमोनियामुळे गाईच्या शरीराचे तापमान वाढते. श्वास घेण्यास त्रास होतो आणि नाकातून पाणी वाहू लागते. ही लक्षणे गायीमध्ये दिसल्यास टर्पेन्टाइन तेल उकळत्या पाण्यात टाकावे आणि वाफ जनावराने आत घ्यावी. यासोबत मोहरीच्या तेलात कापूर मिसळून जनावरांच्या बरगड्यांची मालिश करावी. हिवाळ्यात गाईला न्यूमोनियापासून वाचवण्यासाठी तिला गरम वाफ द्यावी.

जार न पडणे : गाय व्यायल्यानंतर पुढील पाच तासांत जार पडणे आवश्यक असते. असे झाले नाही तर गाय दूधही देत नाही. त्यामुळे वेळेत जार न पडल्यास ताबडतोब पशुवैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. यासोबतच दुधाळ गायीचा मागील भाग गरम पाण्याने धुवावा. असे करताना कोणत्याही परिस्थितीत जाराला स्पर्श करू नये किंवा जार खेचण्याचा प्रयत्न करू नये.

शरिराला जखम झाल्यास : दुधाळ गाय किंवा म्हैस यांना दुखापत झाल्यास, त्यावर तात्काळ इलाज करणे आवश्यक असते. त्यासाठी गायीला किंवा म्हशीला जखम दिसल्यास तात्काळ गरम पाण्यात फिनाईल किंवा पोटॅश टाकून स्वच्छ करावे. त्यामुळे जखमेत किडे असल्यास, टर्पेन्टाइन तेलात भिजवून जनावराच्या त्या भागावर पट्टी बांधावी. तोंडाच्या जखमा नेहमी तुरटीच्या पाण्याने धुवाव्यात. पण त्याचवेळी जखमेशी संबंधित उपाय जाणून घेण्यासाठी डॉक्टरांशी वेळोवेळी संपर्क साधावा.

# अवकाळी व गारपिटीनंतर आंबा, कांदा, डाळिंब पिकांची काळजी

गारपीट व अवकाळी पावसामुळे विविध पिकांचे नुकसान झाले असून, त्या तडाख्यातून वाचलेल्या पिकांचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. जेणेकरून पिके त्या परिस्थितीतून लवकरात लवकर सावरतील. डाळिंब काढणी अवस्थेतील बागांसाठी : हस्त बहार धरलेल्या डाळिंब बागांची फळे काढणी अवस्थेत असताना गारांचा, तसेच पावसाचा फटका जास्त प्रमाणात बसलेला आहे. या बागेतील फळांना इजा झाली असून, काही ठिकाणी फळे तडकण्याचे प्रमाण दिसून येत आहे. जमिनीमध्ये ओलावा असल्याने बुरशीजन्य रोगांचे प्रमाण वाढू शकते. अवकाळी पावसानंतर त्वरित ६ ते ७ दिवसांच्या अंतराने बोर्डो मिश्रण अर्धा टक्के किंवा कॉपर ऑक्झिक्लोराइड २.५ ग्रॅम प्रति लिटर किंवा कॉपर हायड्रॉक्साइड २ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात फवारणी करावी. तसेच झाडांच्या मोडलेल्या फांद्या छाटून झाडांना योग्य आकार देऊन घ्यावा. झाडे पडली असल्यास किंवा वाकलेली असल्यास त्यांना बांबूंचा आधार देऊन खतांचे आणि पाण्याचे व्यवस्थापन करावे.

आंबा : आंबा पिकामध्ये गारपीट, तसेच वादळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात फळांची गळ झाली आहे. सोबत कीड व रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. बागेतील फळगळ थांबविण्यासाठी १३:००:४५ हे खत १० ग्रॅम प्रति लिटर फवारावे. भुरी व फुलकिडींचा प्रादुर्भाव होऊ नये, म्हणून हेक्झाकोनॅझोल १ मि. लि. अधिक फिप्रोनील १.५ मि. लि. प्रति लिटर एकत्रितपणे फवारावे.

कांदा : कांदा पातीला गारपिटीमुळे जखमा झाल्यामुळे बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढत आहे. यासाठी अॅझाक्सीस्ट्रोबीन ०.५ मि. लि. प्रति लिटर किंवा टेब्युकोनॅझोल १ मि. लि. प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. तसेच फुलकिडच्यांच्या नियंत्रणासाठी फिप्रोनील १.५ मि. लि. प्रति लिटर स्टीकरसह फवारावे. यानंतर दुसरी फवारणी १३:००:४५ ची पाच ग्रॅम प्रति लिटर अधिक सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या मिश्रणांची २.५ ग्रॅम प्रति लिटर एकत्रितपणे फवारणी करावी. अशा अवस्थेत पिकास जमिनीतून एकरी ५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे.


टोमॅटो : गारपिटीमुळे खोड व फांद्यांना इजा झाली असल्यास कॉपर हायड्रॉक्साइड २ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात फवारणी करावी. करपा रोगाच्या नियंत्रणासाठी बेनोमिल ०.५ ग्रॅम प्रति लिटर, फळ पोखरणाऱ्या अळी आणि फुलकिडच्यांच्या नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ०.३ मि. लि. प्रति लिटर या प्रमाणात फवारावे. तसेच फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी फिप्रोनील १.५ मि.लि. प्रति लिटर अधिक करंज तेल २ मि.लि. प्रति लिटर स्टीकरसह फवारावे.वेलवर्गीय भाजीपाला : वेलवर्गीय भाजीपाल्यामध्ये भुरी आणि अॅन्ट्रॅक्नोज नियंत्रणासाठी हेक्झाकोनॅझॉल एक मि. लि. प्रति लिटर या प्रमाणात फवारणी करून घ्यावी.



# फणस लागवड करा, अनेक वर्षे मिळेल भरपूर नफा

भारतातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेती सोडून अपारंपारिक शेतीकडे जाण्यास प्राधान्य देत असून आणि त्यात यशस्वी देखील होत आहेत. याशिवाय शेतकऱ्यांना त्यातून चांगले उत्पन्न देखील मिळवत आहेत. कमी वेळेत अधिक नफा मिळविण्यासाठी देशातील शेतकरी भाजीपाला लागवडीला प्राधान्य देतात. यामध्ये फणस लागवडीचाही समावेश असून, त्याची लागवड करून शेतकरी कमी वेळात चांगले उत्पन्न मिळवू शकतात. फणसमध्ये अनेक प्रकारचे पौष्टिक घटक आढळतात. जे शरीरासाठी खूप फायदेशीर मानले जातात.

फणसाची लागवड : फणसाच्या झाडाची उंची ८ ते १५ मीटर असून, वसंत ऋतूपासून फळधारणा सुरू होते. आणि पावसाळ्यापर्यंत फळे देतात. त्याचे झाड आकाराने लहान व मध्यम असून ते बरेच पसरलेले आहे. फणसाची भाजी देखील केली जाते, जी सर्वोत्तम भाजी मानली जाते. शेतकऱ्यांना वर्षभरात ८० ते ९० फळे मिळतात. या झाडापासून मिळणाऱ्या फळाचा रंग गडद हिरवा असून, त्याचा आकार गोल असतो. फणसाच्या बियांचा भाग मऊ असल्यामुळे त्याची फळे पिकण्यास जास्त वेळ लागतो. योग्य माती आणि हवामान : शेतकरी कोणत्याही प्रकारच्या जमिनीत फणसाची लागवड



करू शकतात. परंतु वालुकामय व चिकणमाती जमीन त्यासाठी योग्य मानली जाते. हे एक उष्णकटिबंधीय फळ आहे. कारण ते आर्द्र आणि कोरड्या दोन्ही हवामानात तयार केले जाऊ शकते. फणस लागवडीला जास्त पाणी लागत नाही. याच्या पिकाला जास्त सिंचनाची गरज नसते, जास्त पाणी दिल्याने त्याचे पीकही नष्ट होऊ शकते. त्याची मुळे पाणी शोषण्यास सक्षम नसतात, म्हणून शेतकऱ्यांना त्याच्या शेतात पाण्याचा निचरा योग्य प्रकारे करावा लागतो.

सुधारित फणस जाती : रसाळ, खाजवा, सिंगापूर, गुलाबी, रुद्राक्षी. फणसाचे रोप कसे लावायचे? या वनस्पतीची लागवड करण्यापूर्वी तुम्हाला पिकलेल्या फणसातून बिया काढाव्या लागतील. पेरणीसाठी सुपीक मातीची निवड करावी लागते. पेरणीपूर्वी सेंद्रिय खत आणि इतर खते जमिनीत चांगली मिसळावी लागतात, जेणेकरून त्याची योग्य मशागत करता येईल. पेरणीनंतर लगेच पाण्याची फवारणी करावी लागते. पेरणीनंतर रोपाची १ वर्ष काळजी घ्यावी लागते.

खत व्यवस्थापन : फणसच्या झाडाला दरवर्षी फळे येतात. त्यामुळे झाडाची सुपीकता व उत्पादकता चांगली राहण्यासाठी वेळोवेळी खताचा वापर करावा लागतो. शेतकरी त्यांच्या शेतात शेणखत, युरिया, पोटॅश आणि फॉस्फरस यांसारखी खते टाकू शकतात. झाडाचा आकार जसजसा वाढतो तसतसे त्याचे खतही वाढवावे लागते. या झाडाला खत घालण्यासाठी एक खड्डा तयार केला जातो ज्यामध्ये खत टाकले जाते.

कीटक आणि रोग : फणस पिकावर कीड व रोग येण्याचे मुख्य कारण म्हणजे वेळेवर खत न देणे आणि कमी पाणी देणे. याशिवाय फणसाच्या शेतातील ओलावा हे देखील रोगाचे प्रमुख कारण असू शकते. अनेक वेळा पिकाला जास्त सिंचन आणि अतिवृष्टीमुळे शेतात ओलावा निर्माण होतो, ज्यामुळे पिकाच्या उत्पादकतेवर परिणाम होतो.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### शहीद स्मृती दिन

### महत्वाच्या घटना

१८३९ : बोस्टन मॉर्निंग पोस्ट या वृत्तपत्रात ओ. के. या शब्दाचा पहिला छापील उपयोग झाला.
१८५७ : न्यूयॉर्क शहरात पहिली लिफ्ट सुरू करण्यात आली.
१८६८ : कॅलिफोर्निया विद्यापीठाची ओकलंड येथे स्थापना झाली.
१९१९ : बेनिटो मुसोलिनी यांनी मिलान इटली मध्ये हुकूमशाही राजकीय चळवळ सुरूकेली.
१९३१ : सॉन्डर्सचा वध करणार्या भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांना लाहोरच्या तुरूंगात फाशी देण्यात आले.
१९४० : संपूर्ण स्वतंत्र पाकिस्तानच्या निर्मितीचा ठराव लाहोर येथील मुस्लीम लीगच्या अधिवेशनात संमत
१९५६ : पाकिस्तान हे जगातील पहिले इस्लामी प्रजासत्ताक बनले.
१९६५ : अमेरिकेतील अंतराळ संस्था नासाने आपले पहिले अंतरीक्ष यान 'जैमिनी ३' च्या साह्याने दोन व्यक्तींना अंतराळात पाठविले होते.
१९८० : प्रकाश पदुकोण याने ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धा जिंकली. ही स्पर्धा जिंकणारा तो पहिला भारतीय आहे.
१९८६ : भारतीय राखीव पोलीस दलातील महिलांच्या पहिल्या तुकडीला प्रशिक्षित करण्यात आले.
१९९८ : अभिनेते दिलीपकुमार यांना 'निशान-ए-इम्तियाज' हा पाकिस्तानचा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
१९९९ : क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर आणि अभिनेत्री सुलोचना यांना 'पद्मश्री' सन्मान प्रदान करण्यात आला.
१९९९ : पं. भीमसेन जोशी व लता मंगेशकर यांना 'पद्मविभूषण' सन्मानाने गौरविण्यात आले.
१९९९ : लता मंगेशकर व पंडीत भीमसेन जोशी 'पद्म भूषण' पुरस्कार व सचिन तेंडुलकर, सुलोचना यांना 'पद्मश्री' पुरस्कार मिळाला.
२००१ : रशियाचे मिर हे अंतराळ स्थानक पृथ्वीवर कोसळले.
२०१२ : भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर हे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० शतक पूर्ण करणारे पहिले खेळाडू बनले.
२०१४ : युरोपीय संघ आणि अमेरिकेने रुस राष्ट्रावर प्रतिबंध लावला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१४ : मुघल बादशाहा शहाजहा आणि मुमताज महल यांची सर्वात थोरली मुलगी जहाँआरा यांचा जन्मदिन.
१६९९ : अमेरिकन वनस्पतिशास्त्रज्ञ जॉन बार्ट्राम यांचा जन्म.
१७४९ : फ्रेंच गणितज्ञ पिएर सिमॉन दि लाप्लास यांचा जन्म.
१८८० : भारतीय क्रांतिकारक चित्तरंजन दास यांच्या पत्नी स्वातंत्र्यता क्रांतिकारी बसंती देवी यांचा जन्मदिन.
१८८१ : नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच लेखक रॉजर मार्टिन दु गार्ड यांचा जन्म.
१८८१ : नोबेल विजेते रसायनशास्त्रज्ञ हेर्मान स्टॉडिंगर यांचा जन्म.
१८८३ : मंजेश्वर गोविंद पै तथा राष्ट्रकवी गोविंद पै कन्नड कवी व श्रेष्ठ भाषा संशोधक, इतिहास व तत्त्वज्ञानाचे व्यासंगी, त्यांना कन्नड, कोंकणी, इंग्लिश, तुळू, संस्कृत, तेलुगू, तामिळ, मराठी, कन्नड, बंगाली, पर्शियन, पाली, ऊर्दू, ग्रीक, जपानी इ. २५ भाषा अस्खलित येत असत. त्यांनी अनेक जपानी ग्रंथांचे कन्नडमध्ये भाषांतर केले. (मृत्यू: ६ सप्टेंबर १९६३)
१८८९ : प्रख्यात भारतीय संस्कृत अभ्यासक, कवी, तत्ववेत्ता, व्याकरणकार, बहुपक्षी आणि राजस्थानमधील जयपूरच्या तंत्रज्ञांचे तज्ज्ञ, भट्ट मथुरानाथ शास्त्री यांचा जन्मदिन.
१८९३ : भारतीय व्यापारी गोपालस्वामी दुराईस्वामी नायडू यांचा जन्म. (मृत्यू: ४ जानेवारी १९७४)
१८९८ : नलिनीबाला देवी आसामी कवयित्री व लेखिका (मृत्यू: २४ डिसेंबर १९७७)
१९१० : डॉ. राम मनोहर लोहिया समाजवादी नेते, विख्यात संसदपटू, लोकसभेतील प्रभावी वक्ते व व्यासंगी लेखक. १९३२ मधे 'मिठाचा सत्याग्रह' या विषयावरील प्रबंधाकरता त्यांना बर्लिन विद्यापीठाने डॉक्टरेट पदवी दिली. इंग्रजीचे ते उत्तम जाणकार होते . मात्र त्यांना इंग्रजीची गुलामी मान्य नव्हती. इंग्रजी येत असुनही 'अंग्रेजी हटाओ' ही चळवळ त्यांनी चालविली होती. (मृत्यू: १२ आक्टोबर १९६७)
१९१२ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ आणि अभियंते वर्नर फॉन ब्रॉन यांचा जन्म.
१९१६ : हरकिशन सिंग सुरजित मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते व पॉलिट ब्यूरोचे सदस्य (मृत्यू: १ ऑगस्ट २००८)
१९१९ : भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्त्या, राजकारणी तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या खासदार सुभद्रा जोशी यांचा जन्मदिन
१९२३ : हेमू कलाणी क्रांतिकारक (मृत्यू: २१ जानेवारी १९४३)
१९३१ : व्हिक्टर कॉर्चनॉय रशियन बुद्धीबळपटू
१९५३ : किरण मुजूमदार शॉ भारतीय महिला उद्योजक
१९५४ : अमेरिकन फॅशन डिझायनर केनेथ कोल प्रॉडक्शन चे स्थापक केनेथ कोल यांचा जन्म.
१९६८ : माईक अॅथरटन इंग्लिश क्रिकेटपटू
१९७६ : भारतीय अभिनेत्री, निर्माता आणि राजकारणी स्मृती इराणी यांचा जन्म.
१९८७ : अभिनेत्री कंगना रणावत यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३१ : सरदार भगतसिंग, सुखदेव, शिवराम राजगुरु या तिघांना लाहोर तुरुंगामध्ये संध्याकाळी साडेसात वाजता फ़ाशी देण्यात आली. हे क्रांतीकारक देशासाठी हसतहसत फ़ासावर चढले. हुतात्म्यांचं पुण्यस्मरण.
१९३१ : भगत सिंग क्रांतिकारक (जन्म: २८ सप्टेंबर १९०७)
१९३१ : 'सुखदेव' थापर क्रांतिकारक (जन्म: १५ मे १९०७)
१९३१ : शिवराम हरी 'राजगुरू' (जन्म: २४ ऑगस्ट १९०८)
१९६५ : भारतीय स्वातंत्र्यता कार्यकर्ता सुहासिनी गांगुली यांचे निधन.
१९८८ : पंजाबी भाषिक कवी पाश यांचे निधन.
१९९१ : व्हिक्टोरिया क्रॉस सन्मानित भारतीय सैनिक प्रकाश सिंग यांचे निधन. (जन्म: ३१ मार्च १९१३)
२००७ : मराठी साहित्यिक श्रीपाद नारायण पेंडसे यांचे निधन.
२००८ : गणपत पाटील मराठी चित्रपट कलाकार (जन्म: १९१८?)
२०१० : भारतीय नक्षलवादी चळवळीचे जनक कानू सान्याल यांचे निधन.

# शेतकऱ्यांना आधार देणारा, महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेकडे नेणारा अर्थसकल्प-रावसाहेब दानवे

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी दि.०६ मार्च २०२६ रोजी अर्थसंकल्प सादर केला, यामध्ये शेतकऱ्यांना दोन लाखांची कर्जमाफी देऊन आधार, एआय तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीला प्रगतीच्या महामार्गावर नेणारा पक्क्या रस्त्यांद्वारे ग्रामीण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आणखी मजबूत करणारा, मेट्रोसारख्या सुविधांच्या माध्यमातून शाश्वत शहरी विकासाला चालना देणारा महायुती सरकारचा यावर्षीचा अर्थसंकल्प महाराष्ट्राला लवकरच ट्रिलियन डॉलर्स ची अर्थव्यवस्था बनवेल, असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केला आहे.



यावेळी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, भाजपा जालना ग्रा. जिल्हाध्यक्ष आ.नारायणभाऊ कुचे, माजी आ. कैलास गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, बद्रीनाथ पठाडे, गटनेते महेश निकम, नगरसेवक अक्षय गोरंटयाल, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, गोविंद ढेंबरे, सुनील खरे, अमोल धानुरे, माजी जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, सतीश जाधव, बाबासाहेब कोलते, आदींची प्रमुख उपस्थिती होती.रावसाहेब पाटील दानवे यांनी राज्याच्या अर्थसंकल्पाचा विस्ताराने आढावा घेऊन त्यातील सर्व समाज घटकांसाठी करण्यात आलेल्या विविध तरतुदींची माहिती दिली. ते म्हणाले की, विकसित भारताचे स्वप्न २०४७ पर्यंत साध्य करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्धाराला महाराष्ट्राची मोलाची साथ मिळावी या दृष्टीने या वर्षीच्या अर्थसंकल्पाची आखणी करण्यात आली आहे. शेती, उद्योग, सेवा, ऊर्जा, शिक्षण, सिंचन, पायाभूत सुविधा अशा सर्व क्षेत्रांच्या विकासाचा मार्ग दाखविण्याबरोबरच या अर्थसंकल्पात सामान्य माणसाला सुशासनाची, गतिमान प्रशासनाची अनुभूती देण्यासाठीही दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेण्यात आले आहेत. गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना महायुती सरकारने दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करून मोठा आधार दिला आहे. दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांचे दोन लाखांचे कर्ज माफ करण्याबरोबरच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी, ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी इत्यादी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक इकोसिस्टीम यासारखे निर्णय शेतकऱ्याला गतिमान बाजारपेठेशी जोडण्यात मदत करणारे आहेत, असे त्यांनी नमूद केले. रावसाहेब पाटील दानवे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरुच राहणार आहे. या योजनेसाठी सुमारे २० हजार कोटींची तरतूद महायुती सरकारने केली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून १६ हजार मे.वॅ. ऊर्जाक्षमता निर्माण करण्यात येणार आहे. यातून १०० टक्के कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा होईल.

## ओबीसी चळवळीचा बुलंद आवाज हरवला

### ऑल इंडिया मुस्लिम संघटनेचे नेते शब्बीर अन्सारी यांचे निधन | छगन भुजबळांनी व्यक्त केला शोक

जालना। प्रतिनिधी

ऑल इंडिया ओबीसी मुस्लिम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शब्बीर अहमद अन्सारी यांचे आज निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे ओबीसी चळवळीचा एक बुलंद आवाज हरवल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनावर मंत्री छगन भुजबळ यांच्यासह अनेकांनी शोक व्यक्त केला आहे. शब्बीर अहमद अन्सारी हे गत काही महिन्यांपासून आजारी होते. काल त्यांनी आपल्या कुटुंबीयांसोबत ईद साजरी केली. त्यानंतर आज दुपारी १२.३० वा. त्यांनी जालना येथील आपल्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यावर आज रात्रीच उशिरा अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. शब्बीर अन्सारी यांनी सुरुवातीला मुस्लिम ओबीसी आरक्षणासाठी खंबीर लढा दिला. त्यांनी ओबीसी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. आपले उभे आयुष्य ओबीसींच्या न्याय हक्कासाठी समर्पित केले. त्यांनी नुकत्याच झालेल्या ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनातही सहभाग घेतला होता.

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा बडे ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी शब्बीर अन्सारी यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. ते म्हणाले, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस आणि ऑल इंडिया ओबीसी मुस्लिम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शब्बीर अहमद अन्सारी यांच्या निधनाचे वृत्त मनाला चटका लावणारे आहे. त्यांच्या जाण्याने ओबीसी चळवळीचा बुलंद आवाज आणि लढवय्या नेता गमावला आहे. शब्बीर अन्सारी केवळ माझे सहकारी नव्हते, तर ओबीसी चळवळीतील माझे अत्यंत विश्वासू आणि खंदे सोबती होते. मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्यासाठी आणि बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही गेली अनेक दशके खांद्याला खांदा लावून संघर्ष केला आहे.

शब्बीरभाई यांनी जात आणि वर्ग यातील फरक अचूक ओळखून मुस्लिम समाजासाठी आरक्षणाची जी कायदेशीर आणि सामाजिक मोहीम हाती घेतली होती, ती यशस्वी करून दाखवली. मुस्लिम ओबीसी समाजाला आरक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान ऐतिहासिक स्वरूपाचे आहे.



### मंडल आयोग चळवळीचा शिलेदार हरपला-लक्ष्मण हाके

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनीही शब्बीर अन्सारी यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. ते म्हणाले, शब्बीर अन्सारी यांच्या निधनाने मनाला खूप वेदना झाल्या. मंडल आयोग लागू करण्यासाठी उभ्या राहिलेल्या महाराष्ट्रातील चळवळीचा शिलेदार हरपला. मंडल आयोग ओबीसी चळवळ आणि देश पातळीवरची ओबीसीची चळवळ जगलेला, अवलिया आज आपल्यातून निघून गेला. शब्बीर अन्सारी यांना आज भावपूर्ण श्रद्धांजली.

'मंडलनामा' या त्यांच्या ग्रंथामधून त्यांनी स्वतःचा आणि मुस्लिम ओबीसी संघटनेचा जो खडतर प्रवास मांडला आहे, तो सामाजिक चळवळीचा एक महत्त्वाचा दस्तऐवज असून, येणाऱ्या पिढ्यांना आपल्या हक्कासाठी सदैव प्रेरणा देत राहील. या ग्रंथाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन माझ्या हस्ते झाले होते, ही माझ्यासाठी नेहमीच स्मरणात राहणारी बाब आहे. अन्सारी साहेबांनी मांडलेली भूमिका आणि त्यांनी दिलेला लढा हा केवळ मुस्लिमांसाठी नसून तो संपूर्ण वंचित घटकांसाठी होता. स्व. विलासराव देशमुख, शरद पवार साहेब यांच्यापासून ते युती सरकारच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांना सोबत घेऊन त्यांनी ओबीसींच्या प्रश्नांवर मार्ग काढला. त्यांच्या जाण्याने समता परिषदेची आणि माझी वैयक्तिक मोठी हानी झाली आहे. एक सच्चा आणि लढवय्या नेता आज आपल्यातून निघून गेला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. अन्सारी परिवाराच्या या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत, असे भुजबळांनी म्हटले आहे.

## प्रवेशबंदी असूनही अवजड वाहने सर्रास येतात शहरात

### बायपास सोडून अवजड वाहने शहरात, नियम मोडणाऱ्यांना राहिला नाही पोलिसांचा धाक

अहिल्यानगर। प्रतिनिधी

दिवसा अवजड वाहनांना शहरात प्रवेशबंदी असतानाही, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची सर्रास पायमल्ली होत असल्याचे चित्र दिसत आहे. बायपासचा मार्ग सोडून टोल वाचवण्यासाठी ही वाहने शहरातून ये-जा करत आहेत. पोलिसांकडून केवळ दंडात्मक कारवाई होत असल्याने या बेशिस्त वाहतुकीला चाप बसलेला नाही. तसेच शहरातील वाहतूक कोंडी आणि अपघातांचे सत्रही कायम आहे.सध्या शहरात ठिकठिकाणी रस्ते दुरुस्तीची कामे सुरू आहेत. त्यातच अवजड वाहनांच्या प्रवेशामुळे सकाळ-संध्याकाळ नोकरदार आणि शालेय विद्यार्थ्यांची मोठी कुचंबणा होत आहे. विशेषतः सोलापूर आणि पुणे महामार्गावरून येणारे कंटेनर व ट्रक रात्री ९ नंतर संभाजीनगर रस्त्यावर लांबच लांब रांगा लावतात. या बेकायदा वाहतुकीमुळे गेल्या काही दिवसांत अनेक निष्पापांचे



बळी गेले असून, चार दिवसांपूर्वीच एका अवजड वाहनाने काही गाड्यांना चिरडल्याची घटना घडली.

शहर वाहतूक शाखेकडे असलेल्या अपुऱ्या मनुष्यबळाचा फायदा वाहनचालक घेत आहेत. केवळ दंड वसूल करून महसूल वाढवला जात असला, तरी सामान्य नागरिकांचा जीव मात्र टांगणीला लागला आहे. या विरोधात आता संतप्त नगरकरांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.सन २०११ मध्ये जिल्हाधिकारी डॉ.पी.अन्बलगन यांनी सकाळी ९ ते १२, सायंकाळी ५ ते रात्री ८ या वेळेत अवजड वाहनांना शहरात प्रवेशबंदी केली. सन २०१६ मध्ये जिल्हाधिकारी अनिल कवडे यांनी अवजड वाहनांना सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत शहरात कायमची प्रवेशबंदी केली. सन २०१६ पासून बायपास रस्त्यांना जोडणाऱ्या शेंडी, विळद, कल्याण, केडगाव, अरणगाव, आदी चौकांमध्ये कायमस्वरुपी वाहतूक व स्थानिक पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला आहे. सप्टेंबर २०२५ पासून जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी अवजड वाहनांना सकाळी ६ ते रात्री १ यावेळेत प्रवेशबंदी केली.

फक्त रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत अत्यावश्यक वस्तूंच्या वाहतुकीसाठी वाहनांना प्रवेश आहे. या विभागांची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिसूचनेचे उल्लंघन झाल्यास अवजड वाहनांवर कारवाई करण्याची जबाबदारी शहराच्या हद्दीत शहर वाहतूक शाखेची आहे. महामार्गावरुन शहरात येणाऱ्या चौकांमध्ये महामार्ग पोलिसांनी दक्ष राहण्याची गरज आहे. तसेच उपप्रादेशिक परिवहन विभागही शहरातील अवजड वाहनांवर कारवाई करु शकतो.

## हा तोच महाराष्ट्र आहे का?;अशोक खरात प्रकरणावरून दानवेंनी व्यक्त केल्या भावना

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार या खरातने केले असल्याचे समोर आले आहे. तसेच रुपाली चाकणकर यांचे अनेक फोटो व्हिडिओ अशोक खरातसोबत असल्याचे दिसून आल्यानंतर त्यांना राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा पदावरून पायउतार व्हावे लागले आहे. या भोंदुगिरीच्या प्रकरणांवर शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपले विचार मांडले आहेत. अंबादास दानवे यांनी ट्विट करत महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व तसेच समाजधुरिण यांना उद्देशून म्हटले की, महाराष्ट्र हे देशातील एक अत्यंत पुरोगामी, विचारी आणि स्वाभिमानी प्रवृत्ती जपणारे राज्य आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्यापासून ते हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्यासारख्या उत्तुंग नेतृत्वाने या मातीला विचारांचे खतपाणी घातले. या महान नेत्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणात कधीही अंधभक्तीला, बुवाबाजीला किंवा ढोंगीपणाला थारा दिला नाही. उलट, त्यांनी सामान्यांमध्ये तार्किक विचार आणि प्रखर वैज्ञानिक दृष्टिकोनाची पेरणी केली. पुढे अंबादास दानवे म्हणाले, आज मात्र राज्याची सद्यस्थिती आणि विशेषतः नाशिकमधील कॅप्टन अशोक खरात यांसारखी प्रकरणे पाहिल्यावर मनात दाटून येणारा प्रश्न हाच आहे की, हा खरोखर तोच महाराष्ट्र आहे का? जिथे हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेबांसारखा अंधश्रद्धा मुळापासून उपटून टाकणारा आणि थोतांडावर आसूड ओढणारा क्रांतीकारी नेता जन्माला आला, त्याच नेत्याचे भक्त म्हणवणारे आज सत्ता आणि स्वार्थासाठी खरात सारख्या भोंदू प्रवृत्तींची संगत आवडीने पसंत करत आहेत?

## आरोप सिद्ध झाले तर भर चौकात गोळ्या घाला

### अशोक खरात प्रकरणी कालीचरण महाराजांची प्रतिक्रिया

धाराशिव। प्रतिनिधी

अशोक खरात सारख्या भोंदूंवर आरोप सिद्ध झाले तर भर चौकात गोळ्या घालाव्यात, असे विधान कालीचरण महाराज यांनी केले आहे. नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरातला पोलिसांनी अटक केली असून त्याच्या चौकशीसाठी एसआयटी पथक स्थापन करण्यात आले आहे. अशोक खरात हा किती विकृत होता याची संपूर्ण माहिती आता उघड झाली आहे. तसेच त्याच्या नावावर असलेली बेनाम संपत्ती देखील समोर आली आहे. तसेच महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे अनेक व्हिडिओ समोर आले आहेत. त्यामुळे त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी सर्वच स्तरातून होताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर कालीचरण महाराज यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

पत्रकारांशी संवाद साधत असताना कालीचरण महाराज यांना धर्माच्या नावावर पैशांचा बाजार सुरू असल्याबद्दल विचारणा केली, त्यावर उत्तर देताना ते म्हणाले, बाजार सगळीकडे आहे. वकील पैसे घेतात, डॉक्टर पैसे घेतात, मजूर पैसे घेतात. मग धर्माचे कार्य करणाऱ्यांनी पैसे घेऊ नये, असा काही नियम आहे का? धर्माचे कार्य करणाऱ्यांनाही मानधन दिले जाते. त्यात दोष नाही. दोष तेव्हा निर्माण होतो जेव्हा लोकांना ठगले जाते. जो लोकांना ठगतो तो नरकात जाणार आहे. जे लोक कूकर्म करत आहेत ते नरकात जाणार आहेत. त्यांना शासकीय दंडही मिळणार, असे त्यांनी म्हटले आहे. पुढे बोलताना कालीचरण महाराज म्हणाले, स्वयंघोषित कोणताही महाराज नाही. लोक त्यांना महाराज म्हणतात. कोणताच महाराज म्हणत नाही की मला महाराज म्हणा. लोकांनी महाराज केलेला आहे. लोकांनी पूजनीय पदावर बसवले असेल आणि त्या पदावरुन दुरोपयोग होत असेल, कूकर्म होत असेल, किंवा धर्म कलंकीत केले जात असेल तर ते लोक महापापी आहेत. जे लोक अशा कूकर्मात अडकले आहेत, त्यांचे गुन्हे सिद्ध होतात तर त्यांना भर चौकात गोळी मारली पाहिजे, असे विधान त्यांनी केले आहे.

## सोसायटी अचिव्हर्स' इंग्रजी मॅगझिन्सच्या कव्हर पेजवर ना.पंकजाताई मुंडे झळकल्या!

### इथिकल लिडरशीप अशा शब्दांत राजकीय, सामाजिक प्रवासाचा मॅगझिनने केला गौरव

मुंबई। प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा महाराष्ट्रातील धडाडीच्या नेत्या ना. पंकजाताई मुंडे यांची एक विशेष मुलाखत 'सोसायटी अचिव्हर्स' या मुंबईतून प्रकाशित होणा-या सुप्रसिद्ध इंग्रजी मॅग्झिनने घेतली असून कव्हर पेजवर त्यांना स्थान दिले आहे. 'देअर इज नो सबस्टिट्यूट फॉर इथिकल लीडरशीप' अशा शब्दांत त्यांच्या आतापर्यंतच्या राजकीय, सामाजिक प्रवासाचा मासिकाने गौरव केला आहे.

सोसायटी अचिव्हर्स मॅग्झिनची एक स्पेशल एडिशन या महिन्यात प्रसिद्ध झाली आहे. या इंग्रजी मासिकाचा देश विदेशात मोठा वाचक वर्ग आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या धडाकेबाज कामातून राज्याच्या राजकारणात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे शिवाय काम करण्याची त्यांची एक स्वतःची खास शैली आहे, अतिशय अभ्यासू व तळमळीने




काम करणा-या नेत्या म्हणून त्या ओळखल्या जातात. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले. एक लोकनेत्या म्हणून त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा आढावा या मुलाखतीत घेण्यात आला आहे. मॅग्झिनच्या संपादिका ॲन्ड्रेया कोस्टबीर यांनी त्यांची विशेष मुलाखत घेतली आहे. एकूणच त्यांच्या कार्य प्रवासाच्या टप्प्यातील विविध पैलू फोटोच्या माध्यमातूनही उलगडले आहेत. विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांच्या देखील मुलाखती या मासिकात घेतल्या गेल्या आहेत.

यशस्वीतांच्या स्टोरीचा भाग झाल्याचा आनंद: मॅगझिनच्या संपादिका ॲन्ड्रेया कोस्टबीर, अशोक धामणकर यांनी शनिवारी ना.पंकजाताई मुंडे यांची त्यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन या स्पेशल एडिशनचे त्यांच्या हस्ते प्रकाशन केले.

प्रकाशन झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना ना. पंकजाताईंनी आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या, सोसायटी अचिव्हर्स मॅगझिनने त्यांच्या कव्हर स्टोरी ' मध्ये मला स्थान दिले, त्याबद्दल सोसायटी टीमचे आणि विशेषतः ॲंड्रिया व धामणकर यांचे मनापासून आभार मानते. माझ्या आतापर्यंतच्या प्रवासाची ही झलक नक्की वाचा असे आवाहन त्यांनी वाचकांना केले आहे.

## गारपीट व अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा -दानवे

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात दिनांक १९ फेब्रुवारी रोजी झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.जिल्ह्यातील जालना, बदनापूर, मंठा, घनसावंगी या तालुक्यांसह अनेक भागांमध्ये गारपीट व मुसळधार अवकाळी पाऊस झाला. यामुळे कापूस, ज्वारी, हरभरा, गहू, कांदा यांसारख्या प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच आंबा, डाळिंब, केळी आदी फळबागांनाही फटका बसला असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे.

अनेक ठिकाणी उभ्या पिकांची मोडतोड झाली असून पिके आडवी पडली आहेत. गारपिटीमुळे फळबागांचे मोठे नुकसान झाले असून उत्पादनात घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



काही भागांत शेतकऱ्यांनी काढणीसाठी ठेवलेले पीकही पावसामुळे भिजून खराब झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने विलंब न करता तातडीने पंचनामे सुरू करावेत, पीकनुकसानीचा अचूक आढावा घ्यावा आणि शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी दानवे यांनी केली आहे. तसेच, विमा कंपन्यांनीही शेतकऱ्यांच्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन पीकविमा दावे लवकरात लवकर निकाली काढावेत, असेही त्यांनी नमूद केले.

# यश कन्स्ट्रक्शनने बीड ते परळी रस्त्याची लावली वाट

## वाहनधारकांमध्ये संताप : वरिष्ठ अधिकारी मूग गिळून गप्प, कंत्राटदारावर कारवाईची मागणी

**परळी । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या वतीने राज्यमार्ग बीड ते परळी हा रस्ता गेल्या तीन वर्षापासून सुरूच आहे अद्यापही रस्ता पूर्ण झालेला नाही चार वर्षे उलटूनही हा रस्ता पूर्ण होत नसल्याने आणि जागोजागी खड्डे आणि काम सुरू असल्यामुळे वाहनधारक त्रस्त झाले आहेत यश कंट्रक्शन या कंपनीला या कामाचे टेंडर देण्यात आले असून त्यांनी या रस्त्याची पूर्ण वाट लावली आहे संबंधित अधिकारी मात्र मूग गिळून गप्प असून सदर गुत्तेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

बीड पासून ते परळी पर्यंत होणाऱ्या सिमेंट रस्त्याचे काम यश कंट्रक्शन या कंपनीला दिले आहे गेल्या तीन ते चार वर्षापासून हे काम सुरूच आहे अद्यापही काम पूर्ण झालेले नाही बीड ते घोडका राजुरी आणि घोडका राजुरी ते वडवणी या दरम्यानचे काम सुरुवातीला सुरू केले गेले मात्र बीड पासून काही अंतरावर त्यानंतर घोडका राजुरी पासून काही अंतरावर असे टप्प्याटप्प्याने काम केले गेले वाहतुकीसाठी पर्याय व्यवस्था आणि पर्यायी रस्ता न दिल्यामुळे वाहनधारकांना



नाहक त्रास सहन करावा लागत आहे विशेषता या रस्ता कामामुळे अनेक अपघात देखील घडलेली आहे अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधितांना नागरिकांनी तक्रारी देखील केली आहे मात्र संबंधित विभाग या तक्रारीकडे दुर्लक्ष करून कंत्राटदाराला पाठीशी घालत असल्याचे दिसत आहे बीड ते घोडका राजुरी यादरम्यान असलेल्या पुलावर अत्यंत निकृष्ट काम झाले असल्याचे दिसत आहे उद्या पाणी आले तर काही भाग कोसळण्याची भीती देखील व्यक्त केली जात आहे यासोबतच आता वडवणी ते तेलगाव हे काम सुरू असले तरी अद्यापही काम पूर्ण झालेले नाही त्यामुळे वाहनधारकाच्या अनेक तक्रारी आहेत मात्र ते न्याय कुठे मागणार असाही प्रश्न निर्माण होत आहे यापूर्वी संबंधित गुत्तेदाराला काम करण्याचे टाईम लिमिट देण्यात आले होते हे टाईम लिमिट देखील पूर्ण केले गेले नाही अशावेळी दंडात्मक कारवाई केली जाते मात्र संबंधित विभागाने ही कारवाई टाळली आहे म्हणजेच गुत्तेदारापुढे संबंधित विभाग झुकला असेच आता सुरू असलेले तेलगाव दोन्ही बाजूने परळी आणि बीड कडे येणाऱ्या रस्त्याचे काम सुरू आहेत मात्र हे काम धीम्या गतीने असल्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो विशेषता या कंत्रार्थनाला कोणीही नियंत्रण ठेवणारे नसल्यामुळे कंत्राटदाराची मनमानी सुरू असल्याचे बोलले जात आहे विशेषता पूर्वी परळी ला जाण्यासाठी याच मार्गाचा वापर करायचे परंतु आता मांजरसुंबा केज अंबाजोगाई मार्गे परळी कडे प्रवास केला जातो मात्र वडवणी तेलगाव मार्गे नको रे बाबा असे वाहनधारक स्वतःहून बोलत आहेत तेव्हा अशा तंत्राट दारावर दंडात्मक कारवाई बरोबरच गंभीर स्वरूपाची कारवाई केली तर टाईम लिमिटमध्ये इतर तंत्रता काम करतील याशिवाय एका बाजूने काम सुरू असेल तर दुसऱ्या बाजूने पर्यायी व्यवस्था देखील केली जाईल त्यामुळे संबंधित विभागाने तंत्राटधारावर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## चारचाकी गाडीतून अज्ञाताने एक लाख लांबविले; अज्ञात चोरटे सीसीटीव्हीत कैद

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासुन जवळच असलेल्या परभणी चौकातील मोरेश्वर हॉटेल समोर लावलेल्या स्विफ्ट डिझायर क्रं. एमएच ०६ एएस ५५५२ या चारचाकी गाडीतुन दि २० मार्च शुक्रवार रोजी अज्ञात चोरट्याने एक लाख रुपये लांबविले असुन याप्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलिसात सुमन खंडु झेटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संदर्भात माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील सुमन




खंडु झेटे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की,दि २० मार्च शुक्रवार रोजी परभणी चौकातील मोरेश्वर हॉटेलसमोर लावलेल्या स्विफ्ट डिझायर गाडीच्या सिटकव्हर मध्ये कॅरी बॅगमध्ये ठेवलेले नगदी एक लाख रूपये अज्ञात चोरट्याने गाडी लॉक असताना गाडीत कोणीही नसल्याचा फायदा घेवुन चोरले असुन याप्रकरणी ग्रामीण पोलिसात फिर्यादी सुमन खंड झेटे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीं विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक फौजदार बळवंते हे करत आहेत. दरम्यान परभणी चौकात असलेल्या सिसीटीव्ही कॅमे-यात सदरील चोरटे कैद झाले असुन पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविल्यास निश्चीतच चोरटे तात्काळ सापडतील अशी अपेक्षा फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केली आहे.

## पाटोदा नगरपंचायतीचा अजब कारभार: मुख्याधिकारी बसतात तहसीलच्या तिसऱ्या मजल्यावर; वृद्ध आणि अपंगांचे हाल!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा नगरपंचायतीचा कारभार सध्या रामभरोसे चालला असून, मुख्याधिकाऱ्यांच्या अनुपलब्धतेमुळे सामान्य नागरिकांसह कर्मचाऱ्यांनाही मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी आपला कारभार नगरपंचायत कार्यालयातून न चालवता तहसील कार्यालयाच्या तिसऱ्या मजल्यावरून चालवत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. एका स्वाक्षरीसाठी वृद्ध आणि अपंग नागरिकांना तहसीलच्या पायऱ्या चढाव्या लागत असल्याने जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

नगरपंचायत की तहसील कार्यालय? नागरिकांचा सवाल

पाटोदा नगरपंचायतीची स्वतःची स्वतंत्र इमारत आणि यंत्रणा असतानाही, मुख्याधिकारी मात्र बहुतांश वेळ तहसील कार्यालयातच ठाण मांडून असतात. यामुळे नगरपंचायतीच्या कामासाठी येणाऱ्या नागरिकांना मुख्याधिकारी भेटत नाहीत. परिणामी, साध्या दाखल्यापासून ते महत्त्वाच्या कामांच्या फाईल्सवर सह्या घेण्यासाठी कर्मचाऱ्यांना आणि नागरिकांना तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

वृद्ध आणि अपंगांची पायपीट

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी किंवा घरपट्टी, पाणीपट्टी संदर्भातील कामांसाठी अनेक वृद्ध आणि दिव्यांग नागरिक नगरपंचायतीत येतात. मात्र, मुख्याधिकारी तिथे नसल्याचे समजल्यावर त्यांना तहसील कार्यालयाकडे धाव घ्यावी लागते. तहसील कार्यालयाचा तिसरा मजला गाठताना या नागरिकांची मोठी दमछाक होत आहे. ज्या पायऱ्या चढणे तरुणांना कठीण जाते, त्या पायऱ्या वृद्ध आणि अपंगांनी कशा चढायच्या? असा संतप्त सवाल पाटोदावासीय विचारत आहेत.

पूर्णवेळ मुख्याधिकाऱ्याची मागणी जोरात

पाटोदा नगरपंचायत स्थापन झाल्यापासून शहराच्या विकासाची मोठी जबाबदारी या संस्थेवर आहे. मात्र, प्रभारी किंवा अतिरिक्त कार्यभार असलेल्या अधिकाऱ्यांमुळे शहराचे प्रश्न प्रलंबित राहत आहेत. नगरपंचायतीला केवळ स्वतःच्या खुर्चीवर बसून जनतेचे प्रश्न सोडवणारा 'पूर्णवेळ' मुख्याधिकारी मिळावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

आंदोलनाचा इशारा

जर येत्या काही दिवसांत मुख्याधिकाऱ्यांनी आपला कारभार नगरपंचायत कार्यालयातून सुरू केला नाही आणि शासनाने येथे पूर्णवेळ अधिकारी नियुक्त केला नाही, तर शहरातील सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य जनता प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याच्या तयारीत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकरणाकडे तातडीने लक्ष देऊन पाटोदावासीयांची या त्रासातून सुटका करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## शिराळ येथे 'भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व कीर्तन महोत्सवाचे' आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील क्षेत्र शिराळ येथे वै. ह.भ.प. श्री. विंचळेकर महाराज (बाबा) यांच्या प्रेरणेतून यावर्षीही 'अखंड हरिनाम सप्ताह, कीर्तन महोत्सव, वाल्मीकी रामायण पारायण आणि लक्ष्मण शक्ती सोहळा' अत्यंत उत्साहात साजरा होत आहे. हा सोहळा १९ मार्च २०२६ ते २६ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होणार असून, यंदाचे हे नारी शक्ती सन्मान सोहळा २०२६ विशेष वर्ष आहे.

दैनंदिन धार्मिक कार्यक्रम

सप्ताहाच्या काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ८ ते ११ रामविजय ग्रंथ वाचन, दुपारी १ ते ४ रामविजय ग्रंथ वाचन, सायंकाळी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६ संगीत हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ या वेळेत सुप्रसिद्ध कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. रात्री ११ नंतर हरि जागर होईल.

यंदाच्या महोत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सर्व प्रमुख सेवा महिला कीर्तनकार आणि प्रवचनकार पार पाडणार आहेत. यात प्रामुख्याने कीर्तनकार ह.भ.प. प्रतिक्षाताई करडुळे, ह.भ.प. दिपालीताई खिळे, ह.भ.प. वणीताताई पाटील, ह.भ.प. शालिनीताई देशमुख इंदोरीकर, ह.भ.प. आरतीताई शिंगोळे, ह.भ.प. साध्वी आरतीताई शिंदे आणि ह.भ.प. कांचनताई जगताप यांच्या कीर्तनांचे आयोजन करण्यात आले आहे. तर प्रवचनकार ह.भ.प. पुष्पाताई तावरे, ह.भ.प. दिपालीताई कोकाटे, ह.भ.प. वेदीकाताई तावरे, ह.भ.प. शारदाताई हवालदार, ह.भ.प. लताताई चव्हाण आणि ह.भ.प. माधुरीताई बनसोडे आपल्या रसाळ वाणीतून प्रवचन सेवा देणार आहेत.

या सोहळ्यात पान ३ वर

## कोयाळ येथे भव्य कौटुंबिक सत्कार सोहळा; नवनिर्वाचित महापौर ज्योतीताई गाडे यांची विकासकामांसाठी ठाम भूमिका

आष्टी प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कोयाळ येथे दरेकर कुटुंबीयांच्या वतीने अहिल्यानगरच्या नवनिर्वाचित महापौर ज्योतीताई गाडे यांचा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात भव्य कौटुंबिक सत्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. सत्काराच्या या प्रसंगी ज्योतीताई गाडे यांनी आष्टी मतदारसंघाशी असलेले आपले जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित करत नागरिकांसाठी विविध स्तरांवर मदत करण्याची ठोस ग्वाही दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संदीप



उद्योग समूहाचे प्रणेते भानाभाऊ खोतकर होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे, माजी आमदार साहेबराव दरेकर (नाना), मच्छिंद्रनाथ बँकेचे चेअरमन नामदेव भाऊ राऊत, युवा नेते जयदत्त भैय्या धस यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, "दरेकर कुटुंबीयांनी केलेल्या या सन्मानाची उतराई म्हणून मी आष्टी मतदारसंघातील नागरिकांना अहिल्यानगरमध्ये आरोग्य सेवा, शैक्षणिक अडचणी तसेच विविध शासकीय कामांमध्ये मदत करण्यासाठी सदैव तत्पर राहीन. माझ्या परीने आणि माझ्या कुटुंबाच्या माध्यमातून प्रत्येक गरजू नागरिकाला आधार देण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहील."

त्या पुढे म्हणाल्या की, नुकत्याच झालेल्या अहिल्यानगर नगरपरिषद निवडणुकीत माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. पान ३ वर

## पाटोदा तालुक्यात गॅसचा तुटवडा; ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त, आंदोलनाचा इशारा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील ग्रामीण भागात सध्या घरगुती गॅसचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक गावांमध्ये दहा-दहा दिवस गॅस वितरणाची गाडी फिरकत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गॅस टाकी वेळेवर बुक होत नाही. काही वेळा बुकिंग करण्याचा प्रयत्न केला असता आधीच बुकिंग केलेले आहे असा संदेश दाखवला जातो. तर काही प्रकरणांमध्ये गॅस टाकी बुक न करताही गॅस टाकी उचलली असे नोंदीत दाखवले जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे ग्राहकांना आर्थिक फटका बसत असून, यामागे गैरव्यवहार होत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ग्रामीण भागातील महिलांना विशेषतः स्वयंपाकासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पर्यायी इंधनाचा वापर करावा लागत असल्याने अतिरिक्त खर्च आणि त्रास वाढला आहे.

दरम्यान, गॅसचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

या पार्श्वभूमीवर पाटोदा तालुक्यातील गॅस धारकांच्या वतीने तहसील कार्यालयावर लवकरच आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. येत्या सोमवारी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती नागरिकांनी दिली आहे.

## वडवणीत प्रभु श्रीरामाच्या भव्य शोभायात्रेची जय्यत तयारी;आकर्षक देखाव्यांनी शहर भक्तिमय होणार

वडवणी । प्रतिनिधी

प्रभु श्रीरामाच्या शोभायात्रेनिमित्त वडवणी शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून २६ मार्च २०२६ रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि पारंपारिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या सोहळ्यासाठी शहरातील तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून सकल हिंदू समाज बांधव आयोजकांकडून जय्यत तयारी सुरू आहे.



या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता श्रीराम मंदिर येथून भव्य मोटारसायकल रॅलीने होणार आहे. युवकांच्या सहभागातून काढण्यात येणारी ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत जाणार असून शहरात भक्ती व उत्साहाचे वातावरण निर्माण करणार आहे. भगवे झेंडे, घोषणाबाजी आणि शिस्तबद्ध मिरवणूक हे या रॅलीचे वैशिष्ट्य असणार आहे. यानंतर सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कीर्तनाच्या माध्यमातून प्रभु श्रीरामांच्या जीवनातील आदर्श, धर्म, कर्तव्य आणि भक्ती यांचे महत्त्व भाविकांना पटवून दिले जाणार आहे. कीर्तनानंतर सर्व उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या प्रमाणावर भाविक या प्रसादाचा लाभ घेणार आहेत. सायंकाळी ४ वाजता श्रीराम मंदिर येथून भव्य शोभायात्रेला सुरुवात होईल. पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात ही शोभायात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात येणार आहे. शोभायात्रेत विविध पथकांचा सहभाग असणार असून महाकाली पथक, अघोरी पथक आणि पान ३ वर

## भायाळा नारळी सप्ताहास भाविकांची अलोट गर्दी


### नामवंत व दिग्गज कीर्तनकारांची हजेरी; प्रकाश महाराज साठे महाराजांची शिवपुराण कथा

बीड । प्रतिनिधी

आध्यात्म क्षेत्रातील थोर संत, स्वानंद सुखनिवासी १०८ वै. स्वामी गणेशानंद सरस्वती महाराज यांच्या आशीर्वादाने भायाळा येथे दिनांक २० मार्चपासून सुरू असलेल्या नारळी अखंड हरिनाम, १० कोटी नामजप व विष्णू याग सप्ताहास भाविकांनी मोठी गर्दी केली. महामंडलेश्वर स्वामी १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज यांच्या अधिपत्याखाली सदर सप्ताह सुरू आहे.

या सप्ताहात सकाळी १०.०० ते १२.०० व रात्री ८.०० ते १०.०० असे दोन सत्रात नामांकित दिग्गज कीर्तनकारांची कीर्तन आयोजित केली आहे. दुपारी २.०० ते ५.०० यावेळेत ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांची शिवपुराण कथा आयोजित केली आहे. या कथेला उदंड प्रतिसाद मिळाला आहे. सुरुवातीपासूनच कीर्तनासह सर्वच





कार्यक्रमाला महाराष्ट्रातील भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. दि. २३ मार्च रोजी सकाळी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज शिंदे, आळंदी तर रात्री व्याकरणाचार्य ह.भ.प. अर्जुन महाराज लाड यांचे कीर्तन होणार आहे. दि. २४ मार्च रोजी सकाळी ड. ह.भ.प. शंकर महाराज शेवाळे, पुणे यांचे तर रात्री महंत ह.भ.प. हरिहर दिवेगावकर महाराज यांचे कीर्तन, दि.२५ रोजी सकाळी सोपान महाराज शास्त्री, तर रात्री ह.भ.प. अमृताश्रम स्वामी महाराज, बीड दि.२६ रोजी सकाळी ह.भ.प. बाभळगावकर महाराज, करमाळ व रात्री ह.भ.प. प्रल्हाद महाराज शास्त्री, परभणी यांचे कीर्तन होणार आहे. या भव्य दिव्य सप्ताहाची सांगता दि. २७ मार्च रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळात महामंडलेश्वर स्वामी १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज, मठाधिपती, गणेशानंदगड इंदुवासिनी संस्थान, यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. कीर्तनानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. इंदुवासिनी संस्थानचे मठाधिपती महामंडलेश्वर १००८ त्रिविक्रमानंद सरस्वतीजी महाराज यांनी सुरू केलेल्या नारळी सप्ताह भाविकांनी उदंड प्रतिसाद दिला आहे.

## चोपनवाडी हे गाव भगवानगडाशी जोडलं जावं ही बाबांची इच्छा –हभप कृष्णा महाराज शास्त्री

दिंद्रुड । प्रतिनिधी

ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा यांचं श्रीक्षेत्र तपोवन, वांगी या परिसरात त्याकाळी येणंजाणं असायचं, परंतु त्यावेळी चोपनवाडी हे गाव भेटीपासुन सुटलं होतं. मात्र आज मी न्यायाचार्य डॉ.नामदेवशास्त्री महाराजांच्या आदेशानुसार इथे आलो आहे. कदाचित चोपनवाडी हे गाव भगवानगडाशी जोडलं जावं ही संत भगवानबाबांची इच्छा असावी. मधल्या काळात हे गाव गडाच्या कुशी पासून थोडं लांब गेलेलं होतं, मात्र येणाऱ्या काळात भगवानगडाचे द्वार तुमच्यासाठी कधीही खुले असल्याचे प्रतिपादन गडाचे उत्तराधिकारी हभप कृष्णा महाराज शास्त्री यांनी केले.



चोपनवाडी येथील जागृत मारुती मंदिराच्या कलशारोहण व पुनर्प्रतिष्ठापनेचा कार्यक्रम नुकताच पार पडला त्यावेळी भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री बोलत होते. माजलगाव तालुक्यातील चोपनवाडी येथे महारुद्र हनुमानाचे जागृत व नवसाला पावणारे देवस्थान आहे. जीर्ण मंदिराच्या जागेवर ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून लाखो रुपये जमा करत नवीन मंदिराचे सुरेख बांधकाम केले आले. तीन दिवस चाललेल्या भक्तिमय कार्यक्रमाने गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. वे.शा.सं.संतोष जोशी, प्रमोद जोशी, राजू जोशी, दिनकर लिंगसेकर, दिनेश मुळे, विश्वांभर जोशी या ब्रह्मवृंदांनी विविध धार्मिक विधी पार पाडल्या. सोमवारी सकाळी हभप कृष्णा महाराज शास्त्री, हभप आप्पासाहेब महाराज चौरे, स्वामी दयानंद गिरी महाराज, ह.भ.प. पांडुरंग महाराज मुंडे यांच्या शुभहस्ते श्री हनुमान मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचा व कलशारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. हभप आप्पासाहेब महाराज चौरे यांच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. चोपनवाडीकर ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जुन्नरमध्ये पेट्रोल-डिझेल संपल्याची अफवा, पंपांवर प्रचंड गर्दी; प्रशासनाकडून नागरिकांना संयमाचे

**लेण्याद्री । प्रतिनिधी**

पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याची अफवा पसरताच जुन्नर शहरासह परिसरातील पेट्रोल पंपांवर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे चित्र रविवारी (दि. २२) दुपारपासून पाहायला मिळाले. अचानक वाढलेल्या या गर्दीमुळे अनेक ठिकाणी लांबच लांब रांगा लागल्या होत्या.



जुन्नर शहर व परिसरात एकूण पाच पेट्रोल पंप असून त्यापैकी केवळ एकाच पंपावर पेट्रोल आणि डिझेल उपलब्ध असल्याची माहिती समोर आली. उर्वरित पंपांवर इंधन संपल्याने ग्राहकांनी उपलब्ध असलेल्या पंपावर धाव घेतली. परिणामी त्या पंपावर मोठ्या प्रमाणात वाहनांची रांग लागून काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. दरम्यान, सलग तीन दिवसांच्या शासकीय सुट्ट्यांमुळे इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरच्या येण्यात अडथळे निर्माण झाले. त्यामुळे अनेक पंप 'ड्राय' झाल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि अनेकांनी गरजेपेक्षा जास्त पेट्रोल भरण्याचा प्रयत्न केला. या पार्श्वभूमीवर काही पंप मालकांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रत्येक ग्राहकाला केवळ २०० रुपयांपर्यंतच पेट्रोल देण्याचा निर्णय घेतला. तरीही काही ग्राहकांनी अधिक इंधनाची मागणी केल्याने काही ठिकाणी पंप कर्मचारी आणि ग्राहकांमध्ये शाब्दिक वाद झाल्याचेही दिसून आले. भारत पेट्रोलियमचे पंप मालक हितेश शहा यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, इंधनाचा तुटवडा तात्पुरता असून उद्या सकाळपर्यंत टँकर येणार आहेत. त्यामुळे परिस्थिती पूर्णपणे सुरळीत होईल. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि पॅनिक होऊन गर्दी करू नये. गरजेपुरतेच पेट्रोल-डिझेल घ्यावे. काही दिवसांपूर्वी गॅस सिलिंडर तुटवड्याबाबतही अशाच अफवा पसरल्या होत्या. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. त्याच पार्श्वभूमीवर आजची परिस्थिती अधिकच तीव्र झाल्याचे दिसून आले. प्रशासन व पंप मालकांनी नागरिकांना शांतता राखण्याचे आणि अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून, उद्यापासून इंधन पुरवठा सुरळीत होईल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# स्वायत्ततेच्या प्रक्रियेत बी.जे. मेडिकल वगळले? राज्याच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह

पुणे : राज्यातील काही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा देण्याच्या प्रक्रियेला गती देत राज्य सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने याबाबतचा आदेश काढला असून, मुंबई आणि नागपूर येथील महाविद्यालयांचा अभ्यास करून स्वायत्ततेचा आराखडा तयार करण्याची जबाबदारी या समितीवर सोपवली आहे. मात्र, स्वायत्ततेसाठी सर्वप्रथम प्रस्ताव पाठवलेल्या पुण्यातील बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नाव या आदेशात नाही.

मुंबई, पुणे आणि नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना अधिक स्वायत्तता देण्याबाबत गेल्या काही वर्षांपासून शासनस्तरावर हालचाली सुरू आहेत. काही महिन्यांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाला या विषयावर सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, समिती स्थापन करण्यात झालेल्या विलंबामुळे प्रक्रिया पुढे सरकत नव्हती. या वर्षी अखेर समिती स्थापन करण्यास मुहूर्त मिळाला. मात्र, आदेशामध्ये पुण्यातील बी. जे. मेडिकल कॉलेजचा समावेश करण्यात आलेला नाही.वैद्यकीय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार मुंबईतील ग्रॅान्ट सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय (जेजे रुग्णालय) तसेच नागपूर येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थांना स्वायत्त दर्जा देण्यासंदर्भात धोरणात्मक अभ्यास करण्यासाठी समिती नेमली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार हा निर्णय घेण्यात आल्याचे आदेशात नमूद आहे. राज्याचे माजी मुख्य सचिव जयंत कुमार बांठिया यांची समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून, एकूण सात सदस्य या समितीत राहणार आहेत. स्वायत्त वैद्यकीय महाविद्यालयांची प्रशासकीय रचना आणि संचालक मंडळ आणि शैक्षणिक परिषदेची मांडणी कशी असावी, अधिष्ठाता किंवा संचालकांचे अधिकार काय असावेत, आर्थिक आणि प्रशासकीय स्वातंत्र्याची चौकट कशी असावी, कर्मचारी व प्राध्यापकांच्या सेवा अटी कशा ठेवाव्यात, याबाबत समिती शिफारसी करणार आहे. संस्थांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आवश्यक देखरेख आणि उत्तरदायित्वाची यंत्रणा तसेच आवश्यक कायदेबदल याबाबतही मार्गदर्शन केले जाणार असून, समितीला तीन महिन्यांच्या आत आपला अहवाल शासनाला सादर करावा लागणार आहे. समिती वैद्यकीय महाविद्यालयांची विद्यमान प्रशासकीय आणि शैक्षणिक रचना, स्वायत्ततेची गरज, त्यातून होणारे संभाव्य फायदे यांचा अभ्यास करणार आहे. तसेच देश-विदेशांतील यशस्वी मॉडेलचा संदर्भ घेऊन व्यवस्थापन पद्धतीचा आढावा घेणार आहे. यामध्ये दिल्लीतील एम्स, चंदीगड येथील पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था तसेच टाटा मेमोरियल केंद्र यांसारख्या संस्थांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

# महिला दिनानिमित्त गौरव तीच्या कर्तृत्वाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

महिला दिनाचे औचित्य साधून डॉ. दुधभाते नेत्रालय व आदित्य फाउंडेशन यांच्या तर्फे गौरव तीच्या कर्तृत्वाचा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजाच्या प्रगतीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमात राधिका जहागिरदार, अपर्णा देशमुख आणि अनिता देवकर यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या कार्याची दखल घेत उपस्थितांनी त्यांचे विशेष कौतुक केले. या प्रसंगी डॉ. दुधभाते नेत्रालयाचे सर्वेसर्वा डॉ. अनिल दुधभाते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त पोलिस सहायक आयुक्त रुक्मिणीताई गलांडे होत्या.

तसेच महानगरपालिका नगरसेविका ज्योतीताई गोसावी, धनश्रीताई कोल्हे, विखे वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. राम पडळकर, दत्ताभाऊ कोल्हे, आसावरी चव्हाण, साहित्यिक गिरीश वसेकर, डॉ. स्नेहल मानपुत्र, शितल हिरळकर, गौरी निमकर, कोमल भोसले व अनुराग क्षीरसागर यांच्यासह डॉ. दुधभाते नेत्रालयाचा संपूर्ण कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करत समाजात प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

# आनंद दिघे' मंडळ नोंदणीसाठी थेट मदत; पुणे आरटीओकडून विशेष सुविधा सुरू


पुणे : महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील रिक्षा आणि मीटर्ड टॅक्सीचालक-मालकांसाठी सुरू करण्यात आलेल्या धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर्ड टॅक्सीचालक-मालक कल्याणकारी मंडळांतर्गत सभासद नोंदणी प्रक्रिया आता अधिक सुलभ झाली आहे. ऑनलाइन अर्ज भरताना रिक्षाचालकांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांनी विशेष पाऊल उचलले असून, कार्यालयात मदतीसाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त केला आहे. तसेच, विशेष हेल्पलाइन क्रमांकही जारी केला.

अनेक रिक्षाचालकांना इंटरनेट कॅफेवर जाऊन किंवा मोबाईलवरून स्वतः अर्ज भरताना अडचणी येत होत्या. ही बाब लक्षात घेऊन पुणे आरटीओने सोमवार ते शुक्रवार या दिवसात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत विशेष कर्मचारी नियुक्त केले आहेत. हे कर्मचारी रिक्षा, टॅक्सीचालक-मालकांना मंडळाचे सदस्य नोंदणी प्रक्रियेचे थेट मार्गदर्शन करणार आहेत. आरटीओ कार्यालयाला फक्त प्रत्यक्ष भेटच नव्हे, तर दूरध्वनीवरून मदतीसाठी आरटीओने ०२०-२६०५८०८० हा विशेष हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. ज्या लाभार्थ्यांना काही शंका असतील किंवा अर्जाची स्थिती जाणून घ्यायची असेल, त्यांनी या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून करण्यात आले आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सुजीत डोंगरजाळ यांनी नुकतेच विविध रिक्षा संघटनांच्या पदाधिकारी आणि रिक्षा, टॅक्सीचालकांना कल्याणकारी महामंडळाचा ऑनलाइन सदस्य नोंदणी अर्ज कसा भरायचा? याची शिबिरामध्ये सविस्तर माहिती दिली. तसेच, त्यांना हा अर्ज भरण्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शनही केले.

# जांभुळवाडी दरी पुलावर भीषण अपघात; सुदैवाने जीवितहानी टळली

**पुणे । प्रतिनिधी**

नवले पूल परिसरात सुरू असलेल्या अपघातांच्या मालिकेत आणखी एक घटना शनिवारी रात्री उशिरा घडली. जांभुळवाडी दरी पुलावर रात्री सुमारे पावणे बाराच्या सुमारास ३ ते ४ वाहनांचा भीषण अपघात झाला. या अपघातात वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



प्राथमिक माहितीनुसार, या अपघातात तीन जण किरकोळ जखमी झाले असून त्यांना तातडीने जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघाताची तीव्रता लक्षात घेता मोठी दुर्घटना होण्याची शक्यता होती; मात्र रात्रीच्या वेळी वाहतूक कमी असल्याने मोठा अनर्थ टळला. अपघातानंतर रस्त्यावर वाहनांच्या काचांचा मोठ्या प्रमाणात खच पडला होता. घटनास्थळी पोलिसांनी तात्काळ धाव घेत मदतकार्य सुरू केले. अपघातग्रस्त वाहने बाजूला काढून वाहतूक सुरळीत करण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले. दरम्यान, नवले पूल व परिसरात वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# हर्षवर्धन सदगीर बनला सातवा डबल महाराष्ट्र केसरी, अंतिम फेरीत महेंद्र गायकवाड पराभूत

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील वाघोली, तालुका हवेली इथं सुरु असलेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धा सुरु आहे. महाराष्ट्र केसरीचा अंतिम सामना महेंद्र गायकवाड (चरहशपवीर ऋअळज्ञुरव) आणि हर्षवर्धन सदगीर (क्रीहुरीवहरप डरवसळी) यांच्यात झाला. हर्षवर्धन सदगीर यानं महेंद्र गायकवाड याला ४-३ असं पराभूत केलं. या विजयासह हर्षवर्धन सदगीर सातवा डबल महाराष्ट्र केसरी झाला.



महेंद्र गायकवाड यानं पहिल्या हाफमध्ये १ गुण मिळवत आघाडी घेतली. यानंतर हर्षवर्धन सदगीर यानं एक गुण मिळवत बरोबरी केली. पहिला हाफ संपेपर्यंत १-१ असा सामना बरोबरीत होता. दुसऱ्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड याला एक्टिव्हिटी टास्क देण्यात आला, यात त्याला गुण मिळवता आला नाही. यामुळं हर्षवर्धन सदगीरला एक गुण मिळाला. यानंतर हर्षवर्धन सदगीर यानं दोन गुण मिळवले. अशा प्रकारे हर्षवर्धन सदगीर यानं ४-१ अशी आघाडी मिळवली.यानंतर हर्षवर्धन सदगीर बाहेर गेल्यानं एक गुण महेंद्र गायकवाडला मिळाला. कुस्तीचा वेळ संपला तेव्हा हर्षवर्धन सदगीर यानं ४-३ असा विजय मिळवला.

महेंद्र गायकवाड यानं माती विभागातील अंतिम फेरीत सिकंदर शेखचा पराभव केला. तर हर्षवर्धन सदगीर यानं जय पाटील याचा गादी विभागातील अंतिम फेरीत केला. यामुळं महाराष्ट्र केसरीच्या अंतिम लढतीत हर्षवर्धन सदगीर आणि महेंद्र गायकवाड आमने सामने आले.

माती विभागात महेंद्र गायकवाड विजयी

माती विभागाच्या अंतिम फेरीत सोलापूर जिल्ह्यातून महेंद्र गायकवाड आणि हिंगोली जिल्ह्यातून सिकंदर शेख आमने सामने आले होते. या कुस्तीत महेंद्र गायकवाड यानं ३-० असा विजय मिळवला. पहिल्या हाफमधील पहिल्या मिनिटातच महेंद्र गायकवाड यानं २ गुण मिळवले. यानंतर पुन्हा एकदा महेंद्र गायकवाड यानं १ गुण मिळवला. पहिल्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड ३-० अशा आघाडीवर होता. दुसऱ्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड याच्या विरोधात सिकंदर शेख यानं गुण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, सिकंदर शेख याला गुण मिळवण्यात अपयश आलं. यामुळं महेंद्र गायकवाड यानं मॅटवर होणाऱ्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

मॅट विभागातील अंतिम फेरीत हर्षवर्धन सदगीर विजयी

मॅट विभागातील अंतिम फेरीची लढत सोलापूर शहरकडून खेळणाऱ्या जय पाटील आणि नाशिककडून खेळणाऱ्या हर्षवर्धन सदगीर यांच्यात झाली. हर्षवर्धन सदगीर यानं जय पाटील याचा १०-० असा पराभव केला.

# अस्पायर' योजनेत वयोमर्यादेचा अडसर; संशोधन योजनेत अनुभवी प्राध्यापकांना संधी देण्याची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अस्पायर या महत्त्वाकांक्षी संशोधन योजनेचा लाभ घेण्यासाठी लादण्यात आलेल्या ४० वर्षांच्या वयोमर्यादेमुळे शिक्षण वर्तुळात उलटसुलट प्रतिक्रिया उमटत आहे. या अटीमुळे केवळ तरुण प्राध्यापकांनाच संधी मिळत असून, प्रदीर्घ अनुभव असणारे ४० वर्षांवरील प्राध्यापक या योजनेपासून वंचित राहात आहेत.

संशोधनासाठी वयाचा निकष लावल्याने गुणवत्तेवर मर्यादा येत असल्याची टीका होत असून, ही अट शिथिल करून सर्वच स्तरांतील प्राध्यापकांसाठी संशोधनाची दारे खुली करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अस्पायर योजना प्रामुख्याने विद्यापीठ विभाग आणि संलग्न महाविद्यालयांतील अशा तरुण शिक्षकांसाठी आखण्यात आली आहे, जे आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीच्या टप्प्यात आहेत. संशोधकांमध्ये संशोधक वृत्ती जोपासणे आणि त्यांना आर्थिक पाठबळ देणे हा यामागचा हेतू असला, तरी अनुभवी



प्राध्यापकांना यातून वगळल्याने त्यांच्या ज्ञानाचा लाभ विद्यापीठाला मिळत नसल्याचे चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर डॉ. चिंतामण निगळे यांनी अधिसभेत महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडून ही वयोमर्यादा पूर्णपणे रद्द किंवा शिथिल करण्याची शिफारस केली आहे.


वयोमर्यादेसोबतच निधी वितरणातील तांत्रिक अडचणींबाबतही अधिसभा सदस्य डॉ. करिश्मा परदेशी यांनीही लक्ष वेधले आहे. सध्याच्या नियमानुसार मंजूर निधीच्या ५० टक्के रक्कम पहिल्या टप्प्यात मिळते. मात्र, उपकरणे खरेदी करताना ही मर्यादा अपुरी पडते. विशेषतः मानव्यविद्या आणि सामाजिक शास्त्रांमध्ये रसायनांपेक्षा फिल्ड वर्क आणि पुस्तकांसाठी अधिक निधी लागतो. त्यामुळे विषयानुसार निधी वाटपात लवचिकता असावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, सध्या या योजनेतून संशोधकांना साधारण २ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य मिळते. मात्र, बदलत्या गरजा लक्षात घेता या नियमांमध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे. हे दोन्ही प्रस्तावावर अधिसभेत सकारात्मक निर्णय झाल्यास विद्यापीठातील संशोधन अधिक सर्वसमावेशक आणि दर्जेदार होण्याची चिन्हे आहेत.

# सुट्टीच्या दिवशीही भरता येणार मिळकतकर

**पुणे । प्रतिनिधी**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना मिळकतकर भरणा करणे सुलभ व्हावे यासाठी विविध क्षेत्रीय व संपर्क कार्यालयांमध्ये नागरी सुविधा केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ हे ३१ मार्च २०२६ रोजी संपत असल्याने वर्षअखेर नागरिकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांना सोयीस्करपणे मिळकतकर भरता यावा यासाठी महापालिकेअंतर्गत सर्व नागरी सुविधा केंद्रे व संपर्क कार्यालये ३१ मार्च २०२६ पर्यंत साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुटीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहेत. ही केंद्रे २९ मार्च २०२६ पर्यंत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सुरू राहतील. तर ३० व ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.४५ ते रात्री ८.०० वाजेपर्यंत सेवा उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे ज्यांनी अद्याप मिळकतकराचा भरणा केलेला नाही, त्यांनी विहित मुदतीत कर भरून सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत करण्यात आले आहे.




तर भरावा लागेल २४ टक्के दंड

महापालिकेचा मिळकतकर ३१ मार्च पूर्वी न भरल्यास प्रशासनाकडून थकबाकीच्या रकमेवर प्रतिवर्ष मिळकतकराच्या एकूण रकमेवर २ टक्के दंड आकारला जातो. अनेक नागरिकांकडून कर भरण्यासाठी मार्चअखेरीचे शेवटचे दोन तीन दिवस निवडले जातात. मात्र, यावेळी अचानक मोठ्या प्रमाणात कर भरणा केला जात असल्याने महापालिकेचे संकेतस्थळ स्लो होणे तसेच इतर तांत्रिक अडचणी निर्माण होतात.

त्यामुळे, नागरिकांनी आतापासूनच कर भरण्यास प्राधान्य दिल्यास आयत्यावेळी येणाऱ्या अडचणींचा सामना करावा लागणार नाही. त्यामुळे, कर भरण्यासाठी शेवटचे दहा दिवस राहिल्याने नागारिकांनी तत्काळ कर भरावा, असे आवाहन पालिकेने केले आहे.

# युरिया टंचाईची झळ : खतासाठी शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा



राजगुरुनगर : आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस सिलिंडरबरोबरच युरिया खताची टंचाई भासू लागली आहे. खेड तालुका खरेदी-विक्री संघाच्या केंद्रात युरिया खरेदीसाठी शनिवारी (दि. २१) शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. गॅस सिलिंडरबरोबरच आता युरियासाठीही शेतकऱ्यांना रांगेत उभे राहण्याची वेळ आली आहे.इस्रायल-इराण युद्धामुळे नैसर्गिक वायू पुरवठ्यात मोठी अडचण निर्माण झाली आहे. युरिया उत्पादन नैसर्गिक वायूवर अवलंबून आहे. आखातातील ओमान, कतार, सौदी अरेबिया आदी देशांकडून वायू आयात होतो. युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक विस्कळीत झाल्याने गॅसपुरवठा विस्कळीत झाला आहे. खत कंपन्यांसाठी केंद्राने गॅस कोटा ७० टक्क्यांवर मर्यादित केल्याने युरिया उत्पादनावर परिणाम झाला आहे. खेड तालुक्यातील सहकारी खरेदी-विक्री संघात शुक्रवारी रात्री उशिरा एक ट्रक (३५ टन) युरिया उपलब्ध झाला. याची माहिती मिळताच शनिवारी भल्या सकाळी शेतकऱ्यांनी रांग लावली. उन्हाच्या तीव झळा असतानाही शेतकरी रांगेत उभे होते. मर्यादित आवक आणि मोठी मागणी यामुळे अनेक शेतकऱ्यांना युरिया मिळू शकला नाही. उन्हाळी हंगामातील भुईमूग, कांदा, भाजीपाला पिकांसाठी युरिया अत्यावश्यक आहे, पण टंचाईमुळे खत देण्यात अडचणी येत आहेत. काही ठिकाणी जादा दराने युरिया विक्री होत असल्याच्या तक्रारी आहेत.

# एलपीजीला पर्याय 'पीएनजी'कडे वळा; पुण्यात जनजागृती मोहिमेला सुरुवात

**पुणे । प्रतिनिधी**

आखाती देशांमधील युद्धामुळे शहरातील गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. त्यामुळे सहकार आयुक्तालय आणि 'महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड'च्या (एमएनजीएल) संयुक्त पुढाकारातून पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवडमधील सहा हजार सोसायट्यांमधील शंभर टक्के सदनिकांमध्ये 'पाइप्ड् नॅचरल गॅस'चा (पीएनजी) वापर

करण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. ज्यामुळे नागरिकांनी लिक्विफाइड पेट्रोलियम गॅसला (एलपीजी) स्वस्त, सुरक्षित आणि मुबलक असा पर्याय असलेल्या 'पीएनजी'चा अवलंब करावा, असे आवाहन राज्याचे




सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी केले आहे. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या साखर संकुलाच्या सभागृहात याबाबत तावरे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. २०) सायंकाळी बैठक पार पडली. त्यानंतर तावरे यांनी ही माहिती पत्रकारांना दिली. 'महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड'चे व्यवस्थापकीय संचालक कुमार शंकर, संचालक (वाणिज्य) मेजर शंकर करजगी, संचालक बागेश्री मंठाळकर, सहकारचे अपर निबंधक राजेश सुरवसे, शहर जिल्हा उपनिबंधक संजय राऊत, सहकारच्या सहाय्यक निबंधक प्रगती वाबळे व शहर १ ते ६ चे उपनिबंधक, एमसीडीसीचे मंगेश तिटकारे, जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष सुहास पटवर्धन उपस्थित होते.